
मंगळवार, 09 ऑगस्ट 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 15
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 09 AUGUST 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-15 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5



स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जगप्रसिद्ध देवगिरी किल्ल्यावरील चारमिनारवर तिरंगी ध्वजाची रोषणाई करण्यात आली. छायाचित्र : प्रकाश लकडे

# भाजपासाठी धोक्याची घंटा ?

आधुनिक केसरी न्यूज

**पटना : बिहारच्या राजकारणासाठी पुढील २४ तास महत्त्वाचे मानले जात आहेत. मुख्यमंत्री नितीश कुमार एनडीएतून बाहेर पडण्याच्या चर्चेमुळे सर्वच पक्षाने स्वत:ची रणनीती बनवली आहे. मंगळवारी नितीश कुमार यांनी जेडीयूच्या सर्व खासदार, आमदार आणि विधान परिषदेच्या सदस्यांसाठी बैठक बोलावली आहे. तर आरजेडीनेही आमदार-खासदारांना बैठकीसाठी बोलावले आहे. काँग्रेसनेही त्यांच्या आमदारांना पटनात राहण्यास सांगितले आहे. तर जीतन राम मांझी यांनी त्यांच्या पक्षाची बैठक बोलावली आहे.**

बिहारच्या राजकीय घडामोडीला वेग आला आहे. नितीश कुमार भाजपाशी युती तोडू शकतात आणि आरजेडी, काँग्रेस आणि डाव्यांना सोबत घेत नवीन सरकारची स्थापना करू शकतात असे बोलले जात आहे. पुढील २४ तास बिहारच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे एनडीएसाठी संकट उभे राहिले आहे. ज्याप्रकारे नितीश कुमार यांनी भाजपाशी अंतर ठेवले आहे ते पाहता नितीश कुमार काहीतरी मोठे पाऊल उचलणार असल्याचे बोलले जात आहे.

नितीश कुमारांचे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याशी बोलणे झाले आहे. ११ ऑगस्टपर्यंत या दोन्ही नेत्यांची भेट होण्याचीही शक्यता आहे. परंतु अद्याप याला पुष्टी मिळाली नाही.

बिहारमधील राजकीय घडामोडींवर सर्वच पक्षांच्या नजरा आहेत. जेडीयू, आरजेडी आमदार-खासदारांची बैठक उद्या होणार आहे. भाजपाने सध्या वेट अँन्ड वॉचची भूमिका घेतली आहे. राजकीय घडामोडीत एनडीए सरकार व्यवस्थित सुरु आहे. सरकार त्यांचा कार्यकाळ पूर्ण करेल असा दावा भाजपा नेते करत आहेत.

२०१४ लोकसभा आणि २०२५ च्या विधानसभेसाठी तयारीला लागा असे भाजपा आमदारांना कळवण्यात आले आहे. नितीश कुमारांच्या नेतृत्वातच निवडणूक लढवली जाईल असे भाजपाने म्हटले आहे.

### नितीश कुमारांना बनायचे पंतप्रधान?

राज्यात भाजपासोबत युती तुटली नाही तरीही जेडीयू नेते नितीश कुमार पंतप्रधानपदाचा चेहरा असतील असा दावा करत आहेत. जेडीयूचे महासचिव अली अशरफ फातमी यांनी म्हटले की, देशाच्या पंतप्रधानपदासाठी नितीश कुमार यांच्यापेक्षा मोठा नेता कुणी नाही. तर दुसरीकडे वीआयपी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी मंत्री मुकेश सहानी यांनी नितीश कुमार जर महाआघाडीत सहभागी झाले तर केवळ मुख्यमंत्रिपदासाठी जाणार नाहीत. जेव्हा त्यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार बनवले जाईल तेव्हाच जातील असे सांगितले आहे.


# पुरात वाहुन गेल्याने शेतकरी दांपत्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज



**यवतमाळ :** शेतात जागल करून परत येत असताना तलावाच्या खालच्या बाजुला असलेल्या ओव्हरफ्लोमधून येत असता पाण्यात बुडून शेतकरी दाम्पत्याचा मृत्यू झाला. ही घटना राळेगाव तालुक्यातील वरुड जहागीर येथे आज सोमवारी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास घडली. सुभाष राऊत, सुरेखा राऊत रा. वरुड जहागिर असे मृतकाचे नाव आहे.

शेतकरी सुभाष राऊत यांचे गावातील तलावाच्या पलीकडे शेत आहे. शेती पिकाचे संरक्षणासाठी रात्रीच्या वेळी शेतात जागली करीत जात होते. शेतात जागल करून आज सकाळी राऊत दाम्पत्य घराकडे परत येत होते. मुसळधार पावसामुळे तलावाला भरपूर प्रमाणात पाणी होते. दोघेही पती पत्नी तलावाच्या खालच्या ओव्हरफ्लो मधून रस्ता पार करत असताना अशाताच त्यांचा पुराच्या पाण्यात पाय घसरला. दोघेही एकमेकाला वाचविण्याच्या नादात पुराच्या पाण्यात वाहून गेले. यात पती पत्नीचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करून मृतदेह राळेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. त्याच्या मागे दोन मुले, सुना, नातवंड असा आप्त परिवार आहे.


सर्व धर्मप्रेमी, धर्माधिष्ठीत भाविक भक्तांना कळविण्यात येते की, सालाबाद प्रमाणे याही वर्षी चैतन्य परंपरेतील संत निळोबाराय यांचे अनुग्रहीत शिष्य श्री संत शंकरस्वाती महाराज यांचा २७७ वा फिरता नारळी सप्ताह वै.काशिनाथ बाबा खंडाळकर, वै.काशीगिरी महाराज, वै.सावता महाराज पालखेडकर, वै.सुर्यभान बाबा, वै.किसनदेव महाराज, वै.काशिनाथ आण्णा पार्थीकर, वै.बाबुराव महाराज चिकटगांव, वै.रखुमाई महाराज सोमठाणेकर, वै.भैय्यासाहेब पाराळेकर, वै.रंगनाथ स्वामी भिंगारे, वै.जगन्नाथ आण्णा पवार, कै.एम.सी.जाधव, वै.शामराव (दादा) बाभुळतेलकर, स्वर्गीय कैलासरावजी (आबा) चिकटगांवकर यांच्या कृपाशिर्वादाने व श्री.ह.भ.प.सारंगधर महाराज भोपळे (शास्त्री) यांच्या मार्गदर्शनाने व श्री.एकनाथरावजी जाधव यांच्या अध्यक्षते खाली श्री क्षेत्र शिऊर, ता.वैजापूर, जि.संभाजीनगर. येथे संपन्न होत आहे.

श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान श्री क्षेत्र शिऊर फडाचा २७७ वा

## अखंड हरिनाम फिरता नारळी सप्ताह

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते. या राज्यात अनेक संत होऊन गेले जगद्गुरु तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य श्री.संत शंकरस्वामी महाराज व त्यांचे पुत्र नारायण स्वामी महाराज यांचे, औरंगाबाद-नाशिक महामार्गावर वसलेल्या श्री क्षेत्र शिऊर या गावात प्रणिता तीर्थाच्या कडेला भव्य दिव्य समाधी मंदिर आहे. श्री संत शंकरस्वामी महाराजांनी वारकरी संप्रदायाचे कार्य करीत महान भक्तींचे विचार समाजातील सर्व लोकांच्या मनात रुजविले. भक्ती प्रचार प्रसाराचे कार्य चालु असतांनाच, भागवत श्रवण करुन मार्गशीर्ष वद्य अष्टमी शके १६६७ साली आपले पुत्र श्री संत नाराणस्वामी यांचे सह संजिवनी समाधी घेतली. संत शंकरस्वामी महाराज व पुत्र नारायणस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमिताने शिऊर गावात यात्रा भरवली जाते. आठ दिवस चालणाऱ्या या यात्रा उत्सवात अखंड हरि नामस्मरण चालु असते. तर प्रत्येक वर्षी श्रावण महिन्यात अखंड हरीनाम फिरता नारळी सप्ताह संपन्न होत असतो. या सात दिवसात पहाटे काकडा भजन होते. दुपारी किर्तन व प्रसाद, सायंकाळी प्रवचण व प्रसाद व रात्री किर्तनाचा कार्यक्रम असतो. दररोज २० ते २५ हजार व समाप्तीच्या दिवशी १ लाखाच्या वर भाविक उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घेतात. संतभूमी शिऊर येथे बांधण्यात आलेले १२८ फुटी मंदिर मराठवाड्यातील सर्वात मोठे मंदिर ठरले असुन अध्यात्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. औरंगाबाद-नाशिक ७५२ राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या वैजापूर तालुक्यातील शिऊर हे वीस हजार लोकसंख्येचे गाव. ऐतिहासिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा जपणारे गाव अशी या गावाची ओळख आहे. त्यासोबतच मंदीरांचे गाव म्हणुन देखील शिऊर परिचित आहे. पुरातण रावणेश्वर भगवान मंदिर श्री संत बहीणाबाई पाठक, श्री संत शिवाई माता यांचे समाधी मंदिर देखील या ठिकाणी आहेत. अशा ह्या भव्य दिव्य सप्ताह उत्सवात सहभागी होऊन भक्ती ज्ञानामृताचा व महाप्रसादाच्या लाभ घ्यावा हि संस्थानच्या वतीने विनंती.

** आपले विनित **

श्री.ह.भ.प.एकनाथराव खंडेराव जाधव (अध्यक्ष), श्री.ह.भ.प.सारंगधर महाराज भोपळे (उपाध्यक्ष), श्री.ह.भ.प.पोपटराव जाधव (कार्याध्यक्ष), श्री.ह.भ.प.बबन उत्तमराव पा.जाधव (सचिव), श्री.ह.भ.प.श्री.चंद्रभान नामदेव निकम, श्री.ह.भ.प.श्री.रामभाऊ कचरु मगर श्री.ह.भ.प.श्री.जगन्नाथ खंडेराव जाधव, श्री.ह.भ.प.श्री.सुभाषचंद्र विठ्ठलराव जाधव, श्री.ह.भ.प.श्री.नितीन माणिकचंद चुडीवाल, श्री.ह.भ.प.श्री.मधुकर लक्ष्मणराव पवार, श्री.ह.भ.प.श्री.शिवाजी विश्वनाथ साळुंके, श्री.ह.भ.प.श्री.कचरु रंगनाथ जाधव श्री.ह.भ.प.श्री.प्रभाकर शामराव आढाव, श्री.ह.भ.प.श्री.रामभाऊ आबाराव जाधव, श्री.ह.भ.प.प्रा.श्री.विश्वासराव विठ्ठलराव देशमुख, श्री.ह.भ.प.श्री.अनिल बाळनाथ भोसले, श्री.ह.भ.प.श्री.नारायण नामदेव सुर्यवंशी, श्री.ह.भ.प.श्री.वाल्मिक धोंडीराम भावसार श्री.ह.भ.प.श्री.अर्जुन कारभारी क्षिरसागर, श्री.ह.भ.प.श्री.शिवाजी खंडेराव जाडे, श्री.ह.भ.प.सुनिल गणपतराव पैठणपगारे, सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य, शिऊर तसेच सर्व ग्रमस्थ मंडळ, शिऊर व परिसर.

आयोजक : श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान व समस्त ग्रामस्थ श्रीक्षेत्र शिऊर, ता.वैजापूर, जि.संभाजीनगर.

सप्ताहास येणाऱ्या सर्व भाविक-भक्तांचे श्रीक्षेत्र शिऊर नगरीत हार्दिक स्वागत...


# भांडवली साम्राज्यवादात अडकलेलं स्वातंत्र्य...!

आधुनिक केसरी


देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहे. या कालखंडात स्वातंत्र्यानं प्रकाशाची आरास लावली अन् अंधाराला जवळ केलं. स्वातंत्र्यानं अहंमपणाचा दंभ बाळगणा-यांनाही भारतीयत्वाची अन् लोकशाही व्यवस्थाच विविधतेत राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवणारं आभाळगीत झाल्याची जाणीव करून दिली आहे. मात्र स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांतही स्वातंत्र्य म्हणजे काय? या प्रश्नाच्या उत्तरात वंचितांचा मोठा समूह अद्यापही आयुष्य जगत आहे. त्याला स्वातंत्र्याची जाणीव आहे; पण त्याचा आनंदोत्सव साजरा करतानाही त्याच्या डोळ्यांवर अंधाराची पुसटशी रेषा जगण्याचा आनंद हिरावून घेते. स्वातंत्र्यानं अनेक प्रश्न सोडविले; पण अनेक प्रश्न सोडविण्याचे शिल्लक आहेत. हे प्रश्न अद्यापही शून्याच्या वर्तुळात आहेत. अमृतमहोत्सवानं राष्ट्रीय स्वातंत्र्य, वैयक्तिक स्वातंत्र्य, समाजगटांचं स्वातंत्र्य ते व्यवहारातील स्वातंत्र्याचा प्रवास केला असला, तरी सध्याच्या काळात या स्वातंत्र्याचं महत्त्व कमी होत आहे काय? असा सवाल जेव्हा निर्माण होतो, तेव्हा एकीकडे लोकशाही समाजवाद दिसतो तर दुसरीकडे भांडवलदारांचा देशातील सेवाक्षेत्र विकत घेण्याचा डाव अस्वस्थ करतो. देशानं विकासाची गोळाबेरीज केली आहे; पण ७५ वर्षांच्या काळानंतरही काळोखात दडलेले दुःख स्वातंत्र्याने समजूनच घेतले नाही. अर्थात स्वातंत्र्यात जागतिकीकरणाची लाट उपहास करीत आहे. हा उपहास काळीज चिरणारा अन् भोळ्याभाबड्यांना फसविणारा आहे. त्यामुळे अमृतमहोत्सवाचं ऑडिट होण्याची गरज आहे. अन्यथा कालचे स्वातंत्र्य आमच्या गावात पोहोचलंच नाही, आजच्या स्वातंत्र्यानं गळा घोटला आहे, तर उद्याच्या स्वातंत्र्याकडून काय अपेक्षित राहणार आहे? एकीकडे व्यक्तिकेंद्रित राजकारण, तर दुसरीकडे लोकशाहीच्या पवित्र उद्देशाला सुरुंग लावला जात आहे आणि भांडवलशाहीचं खुलं समर्थन केलं जात आहे. लोकशाही व्यवस्थित उभी होण्याअगोदरच तिचे पाय छाटून पांगळे करण्यात आल्याचं चित्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठ्या परिश्रमानं संविधानाची निर्मिती केली; परंतु शेवटच्या माणसाला अजूनही प्रजासत्ताकाचा किंवा स्वातंत्र्याचा अर्थ कळाला नाही. म्हणूनच स्वातंत्र्य, न्याय, बंधुता या मूलमंत्राचं वस्त्रहरण झाल्याचे प्रकार कोणत्या ना कोणत्या रूपानं समोर येत असतात. स्वातंत्र्या! तू गावांच्या वेशीवर कधी गेला नसशील तर जाऊन बघ! गावखेड्यांची शहरीकरणाकडे वाटचाल सुरू आहे; पण लोकशाही अश्रू ढाळत उभी आहे. हा देश भोळ्याभाबड्या लोकांना लुटणाऱ्या लुटारूंनी भावनिक विषारी औषध देऊन फस्त केला आहे. कुणाला वेळही नाही हिशेब घेण्यासाठी अन् देण्यासाठी? सारे हिशेब कागदावरच राहतात. त्यामुळेच देशातील अन्नदाता कायम रस्त्यावर आंदोलनाच्या भूमिकेत दिसतो. देशात धर्मवाद, जातीवाद, प्रांतवाद, भाषावाद आहेत; पण कामगार, बेरोजगारी, विद्यार्थी, आरक्षण, दहशतवाद, नक्षलवाद, महिला अत्याचार, अंधश्रद्धा, कुपोषण या समस्या कधी संपुष्टात येताना दिसत नाहीत. आदिवासी, दलित, भटके विमुक्तांचे राजकीय, सामाजिक अधिकार पूर्ण मिळालेत का? ज्यांना मिळाले त्यांनी स्वतःचा विकास साधला; पण अजूनही वंचितांची संख्या मोठी आहे. संविधानात असलेल्या तरतुदींमुळे का होईना आरक्षण मिळालं. राजकीय अधिकार मिळाले, तरी आदिवासी तरुण नक्षलवादी म्हणून पोलिसांचे बळी ठरतात. उच्च जातीतील मुलींसोबत प्रेमप्रकरण होते. दलितांची नग्न धिंड काढली जाते. दलितांवर सामूहिक अत्याचार केले जातात, असे अन्याय करणारे अनेक पाषाणहृदयी गावे देशाच्या अमृतमहोत्सवातही उभी आहेत. सत्तेच्या शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे शिक्षण भिकेचं लक्षण ठरलं आहे. त्याचे मार्केटिंग सुरू आहे; पण सत्तेला बि-हाड घेऊन भटकणारं भटक्यांचं पोर दिसलं नाही. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे, असं समजाविण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही. म्हणूनच भटके देशाच्या नजरेत कायम गुन्हेगार ठरलेत. गेल्या ७५ वर्षांत देशात अनेक स्थित्यंतरं आली. ज्या देशात साधी सुई तयार होत नव्हती, त्या देशात लोखंडाचे कारखाने उभे राहिले. दोन वर्षांपूर्वी भारतानं प्रथमच जगातल्या अव्वल पाच अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळविलं. हे स्थान पटकावितानाच पाच ट्रियलनची अर्थव्यवस्था गाठण्याची स्वप्नं बघितली. अवकाश, विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योगात भारतीयांच्या बुद्धिमत्तेचा जगभरात वापर केला जातो. या बुद्धिमत्तेतून नवे विचार आले, नवे सरकार आले आणि गेले. परिवर्तनासाठी अनेकांनी लढे उभारले. मात्र सामान्य माणसाला एका सूत्रात बांधून ठेवण्यात कोणत्याही लढ्यांना यश आलं नाही. देशात विविध प्रकारच्या चळवळी मोठ्या उत्साहानं फोफावल्या. भारतातील आदिवासी समाजाच्या वेदनासरकारला कळल्या नाहीत. म्हणूनच अंदमानातील जारवा आदिवासी आदिम युगात जगत आहेत. ही भारतीयांसाठी लज्जेची धन नाही का? कुठं कुठं तर वनस्पती खाऊन हे जगतात. देशात पांढरं सोनं पिकूनही गरीब उघडेनागडे दिसतात. मुंबईची गोलपिठा, पुण्यातील बुधवारपेठ, नागपूरची गंगाजमुना, कोलकात्याच्या सोनगाठीत फुलं फुलण्याअगोदर कळ्या कोमेजून जातात. चक्क लहान मुलींचा लिलाव होतो. ही दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई आहे काय? मग कुठं आहे आपलं स्वातंत्र्य अन् व्यक्तिकेंद्रित विकास? व्यवस्थेत मालक-मजूर संबंध आहेत. तोपर्यंत सामाजिक लोकशाही निर्माण होऊन देशात समता निर्माण होईलच याची हमी राहिली नाही. खरं तर प्रजासत्ताकानं स्वातंत्र्याची फुलं मिळाली. मात्र ती कोमेजलेली आहेत. आपल्या देशात आपलंच सरकार आहे काय, असे प्रश्न काहूर माजवितात. स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे; पण अभिव्यक्तीलाही आता तुरुंगात खडी फोडावी लागते, नाहीतर मूक बनून राहावं लागतं. स्वातंत्र्य हा सत्याचा मार्ग आहे; पण जबाबदारीची जाणीव आहे काय? आत्मनिर्भरतेच्या नावावर सध्याच्या सरकारनं किती कंपन्या विकल्या अन् खासगीकरण केलं? सामाजिक विषमता अद्यापही ओलसर जखमेसारखी आहे. ही जखम स्वातंत्र्यानं शताब्दी गाठली, तरी ओलीच राहणार आहे. कारण भांडवलशाहीच्या पडद्याआड विकासाला केंद्रबिंदू मानत स्वातंत्र्याला अपेक्षित समग्र माणूस सत्तेला घडविता आला नाही, हे खरं आहे. शेवटी स्वातंत्र्य म्हणजे काय? हा सवालच अमृतमहोत्सवालाही व्यथित आणि विचारप्रवृत्त करणारा आहे.



हेमंत प्रकाश बारसागडे




**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद)**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# देवघरातील निरांजने...

आधुनिक केसरी

परवाच्या दिवशी सकाळी बागेमध्ये फिरत असताना मी आणि माझ्या मित्रांमध्ये पती पत्नी परस्परांना अनुकूल असले म्हणजे जीवनात ते किती प्रगती करू शकतात याची चर्चा सुरु होती . एकमेकांना समजून घेणे, साथ देणे आणि आपल्या पतीच्या किंवा पत्नीच्या कार्यात शक्य होईल तेवढे सहकार्य करणे ही खऱ्या अर्थाने दोघांची जबाबदारी असते. सगळ्यांनाच असा लाईफ पार्टनर मिळतो असं नाही. असा जोडीदार लाभणे ही खरं म्हणजे भाग्याचीच गोष्ट. पण तरीही काही स्त्रिया किंवा काही पुरुष असे असतात, की जे आपला जोडीदार त्यांच्या अपेक्षेप्रमाणे नसला, तरी त्याला सांभाळून घेतात. अशा समजदार जोडप्यांचा संसार सुखाचा होतो.

ज्या स्त्रियांनी आपल्या पतीला त्याच्या कार्यात पूर्णपणे साथ दिली, त्यांचे पती सामाजिक जीवनात खूप मोठे कार्य करू शकले. राजकारण आणि सामाजिक जीवनात ज्यांनी मोठे काम केले त्यांच्या मागे त्यांची पत्नी, सहधर्मचारिणी खंबीरपणे उभी होती. याउलट अशाही काही पतिपत्नींच्या जोड्या आहेत की ज्यात पतीने आपल्या पत्नीच्या कर्तृत्वाला वाव दिला, म्हणून त्या मोठे कार्य करू शकल्या. किरण बेदी, सुधा मूर्ती, मेरी कोम ही त्यापैकी काही उदाहरणे. आणि ज्यांनी समाजजीवनात एकमेकांच्या सहकार्याने अद्वितीय कार्य केले आहे अशा आदरणीय पतिपत्नींच्या जोड्या भरपूर आहेत. महात्मा गांधी आणि कस्तुरबा, ज्योतिबा आणि सावित्रीबाई, बाबा आमटे आणि साधनाताई. यांनी परस्परांना सांभाळून घेतले नसते तर सामाजिक जीवनात एवढे मोठे कार्य करणे या दोघांपैकी कोणालाही शक्य झाले नसते.

विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या थोर स्त्रियांची अनेक उदाहरणे या ठिकाणी देता येतील. पण आज मी ती टाळतो आहे. कारण मला आजच्या या माझ्या लेखात रोज आपल्या अवतीभवती वावरणाऱ्या आणि आपल्या कष्टाने, त्यागाने आपलं घर, संसार ऑफिस सांभाळणाऱ्या स्त्रियांची दखल घ्यावीशी वाटते. त्यांचा त्याग अक्षरशः प्रचंड असतो. ' दिव्यत्वाची प्रचिती ' त्यांच्या बाबतीतही आपल्याला येते. अशा कर्तृत्वान स्त्रियांची कितीतरी उदाहरणे आपल्या आजूबाजूला आपण डोळे उघडून पाहिले तर सहज दिसतील. कोणाच्या पतीचे दुकान किंवा काही व्यवसाय असतो. कोणाची दिवसभर बाहेर नोकरी असते. कोणी बाहेरगावी नोकरीस असतो. कोणी सैन्यात असतो. अशा वेळी त्याच्या अनुपस्थितीत घराची जबाबदारी समर्थपणे पेलते ती त्याची सहधर्मचारिणी. कधी कधी जोडीदाराचा व्यवसाय देखील घरासोबतच सांभाळून घेते ती सहधर्मचारिणी. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# पालकत्वामध्ये हुकुमशाही नसावी

आधुनिक केसरी

चांगल्या पालकत्वामध्ये मोठ्या प्रमाणात सातत्य आणि दिनचर्या यांचा समावेश होतो, ज्यामुळे मुलांना नियंत्रणाची भावना मिळते; म्हणजे अपेक्षा, शिस्त आणि लवचिकता निर्माण करण्याच्या रणनीती आणि मुलांचे विकासाचे वय यांच्याबाबतीत अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी मुलांचे सामाजिकीकरण करणे हे चांगले पालकत्वाचे उद्दिष्ट आहे. सदोष पालकत्व तेव्हा घडते, जेव्हा पालक त्यांच्या मुलांच्या सर्वोत्तम हितापेक्षा त्यांच्या स्वतःच्या आवडींना प्राधान्य देतात. काही पालक असे निर्णय घेतात, कि जे त्यांच्या मुलांच्या हिताचे नसतात. याचा अर्थ असा नाही की, चांगले पालक होण्यासाठी तुम्ही तुमच्या मुलाच्या गरजा नेहमी तुमच्यापेक्षा जास्त ठेवाव्यात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

पालक म्हणून, तुम्ही तुमच्या मुलाच्या मूलभूत मूल्यांवर, जसे की धार्मिक मूल्ये आणि त्यांच्या भविष्याशी संबंधित समस्या, जसे की शैक्षणिक निवडींवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत असता. तुमचे तुमच्या मुलाशी असलेले नाते जितके मजबूत असेल तितका तुमचा प्रभाव जास्त असेल, कारण तुमचे मूल तुमचे मार्गदर्शन घेईल आणि तुमच्या मताची आणि समर्थनाची कदर करेल. सर्वात सामान्य पालकांच्या शैलींमध्ये हुकूमशाही, अधिकृत, अनुज्ञेय, असह्य, संलग्नक आणि सकारात्मक यांचा समावेश होतो. कौटुंबिक समुपदेशक पालकत्वाच्या शैलींना तीन श्रेणींमध्ये विभाजित करतात; "हुकूमशाही" (पालकांना माहीत असलेला सर्वोत्तम दृष्टीकोन जो आज्ञाधारकतेवर जोर देतो), "अनुज्ञेय" (जे काही वर्तणूक मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करते, कारण पालकांना त्यांच्या मुलांना नाराज करायचे नसते) आणि "अधिकृत" (जे रचना आणि सुसंगत ह्याच्याशी संबंधित असते).



आधुनिक केसरी

## मौनचि सारथी | रामकृष्ण ||

आकळेना काही | खेळ या दैवाचा ||
म्हणूनी जीवाचा | कोंडमारा ||१||

बोलणे वागणे | स्वार्थाचे सोयरे ||
विपरीत सारे | उमजेना ||२||

मनाचा आक्रोश | अनाथ हुंदका ||
उभा जन्म मुका | आज झाला ||३||

प्रारब्धाचे ऋण | फेडणे चूकेना ||
कर्माची ही दैना | सोसवेना ||४||

नको बोल ऐसा | दुषणांचा माथी ||
मौनचि सारथी | रामकृष्ण ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी


**श्वपाको जल्पाको भवति मधुपाकोपमगिरा**
**निरातङ्को रङ्को विहरति चिरं कोटिकनकैः।**
**तवापर्णे कर्णे विशति मनुवर्णे फलमिदं**
**जनः को जानीते जननि जपनीयं जपविधौ ॥६॥**

हे अपर्णे माते !
जर तुझ्या मंत्रातील एखादे अक्षरसुद्धा कानावर पडले तर त्याचे फळ असे प्राप्त होते की, मूर्खसुद्धा मधुपाकांसारख्या गोड वाणीचे उच्चारण करणारा एक चांगला वक्ता होतो. आणि दीन किंवा महादरिद्र माणूसही करोडो स्वर्णमुद्रांनी संपन्न होऊन चिरकाल पर्यंत निर्भयपणे विहार करतो. जेव्हा तुझ्या मंत्राच्या एका अक्षराच्या ऐकण्याचा असा परिणाम होतो, तेव्हा जे लोक विधीपूर्वक तुझ्या जपात रममाण होतात, त्यांना प्राप्त होणारे उत्तम फळ कसे असेल, यास जाणण्यास कोण समर्थ आहे ? || ६ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## || दासबोध स्तवन ||



# सृष्टीकथन

आधुनिक केसरी

आपण पाचव्या समासात ब्रम्ह आणि माया यांचा संबंध कसा आहे त्यांची लक्षणे कोणती. मानवी बुद्धीच्या पध्दतीने ज्ञानमय ब्रम्ह आणि अज्ञानमय माया यांची तुलना करण्याचा प्रयत्न समासाच्या आधारे केला. समर्थ तत्वज्ञानाच्या आधार घेऊन आपण त्या समासातील अज्ञान, अविद्या, भ्रम, अध्यास,देहबुध्दी हा सर्व मायेचा पसारा आहे. हा मोलाचा विचार आपण शिकलो. माया आणि ब्रम्ह यांचा अभ्यास या समासात केला. समर्थांचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी त्याचे परत परत मनन, चिंतन केले पाहिजे हे मात्र खरे आहे. ब्रम्ह आणि माया मध्ये मायेचे आहे पणाचे गुण ब्रम्हाला नाही पणाने लावले आहेत. त्याचे कारण असे की परमार्थाच्या बाजूने विचार केला तर जगात माणसाचे फक्त दोन वर्ग आहेत. एक जाणता, दुसरा नेणता. जाणते पुरूष आत्मज्ञानी तर नेणते पुरुष मायाज्ञानी असतात. आत्मज्ञानी पुरूषांना ब्रम्ह साक्षात अनुभवास येते. तर अज्ञानी पुरूषाला माया प्रत्यक्ष प्रचीती स येते.अज्ञानी लोकांना द्रुष्य जग कितीही खरे वाटले तरी ते खरे नाही. कारण "काय भुललासी वरलीया रंगा"हे जर खरे आहे पण अज्ञानाचे झापड त्यांच्या डोळ्यावर ऐवढे घट्ट बसलेले असते की माया त्यांना खरी वाटू लागते. यावरून समर्थ म्हणतात की ज्ञानी पुरूष ज्यावेळी अज्ञानी लोकांना ब्रम्ह कसे आहे हे सांगू लागतो त्यावेळी तो मायेचे एक लक्षण घेतो. आणि ते लक्षण ब्रम्हाच्या ठिकाणी नाही असे सांगतो. म्हणून ब्रम्ह अनाम,अरूप,अक्रिय,,असाक्ष अलक्ष,अपार,अप्रत्यक्ष,निर्विकार, निराकार,निराभास, निर्गुण, निरूपाधिक,वर्णहीन,अविनाश, अव्यकक्त, अकर्ता,अद्वैत आहे. असे सांगावे लागते. या समासात जगतमिथ्या आहे हे मत परत परत मांडले आहे.खरेखोटे यांचे मिश्रण म्हणजे मिथ्या होय. ज्ञानी पुरूषाला जगत् परमात्म स्वरूप दिसते तर अज्ञानी लोकांना तेच द्रुष्यरूप दिसते. दोघाच्या बाजूने विचार केला तर दोघेही आप आपल्या द्रुष्टीने खरें आहेत. पण पहिला म्हणतो "स्त्रुष्टीपूर्वी ब्रम्ह असे। तेथे स्त्रुष्टीमुळीचं नसे। आता स्त्रुष्टी दिसत असे। ते सत्य किं मिथ्या. पण पहिला अनुभव यथार्थ तर दुसरा अयाथार्थ असतो. म अज्ञानी माणसांने सध्याचा अनुभव हाताशी धरून ज्ञानी पुरूषांच्या मदतीने व सारासार विचाराने आत्मज्ञानी व्हावे. ते कसे याचा संपूर्ण अभ्यास आपण या "सृष्टीकथन" समासात करणार आहोत. संपूर्ण समास 60 ओव्यात गुंफलेला आहे हळूहळू पण समजेल अशा साध्यासुध्या मार्गाने आपण त्याचा अभ्यास करणार आहोत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# आधी श्रद्धा, मग कृती, नंतर अनुभव

आधुनिक केसरी

गुरुआज्ञे प्रमाणे वागणार्याला कधीही नड येत नाही. राजाच्या राणीला दुपारी जेवायला कसे मिळेल याची काळजी नसते. तसे, गुरूचा आधार आपल्याला आहे असे ठाम समजणार्याला कसली नड असणार ?

लांब उडी घेण्यापूर्वी चार पावले मागे जावे लागते, परिसापाशी सोने व्हायला रुप्याचे लोखंड व्हावे लागते; तसे, गुरूचा पाठीराखेपणा असून आपल्याला जी अधोगतीशी वाटते, ती पुढच्या महत्कार्याची पूर्वतयारीच होय.

बाप मुलाला हातावर घेऊन पोहायला शिकवीत असतानामधून मधून हात काढून घेतो, पण मुलाची खात्री असते की हा आपल्याला बुडू देणार नाही, तसा आपल्याला सद्गुरूचा आधार आहे अशी आपण पक्की खात्री बाळगावी.

आपण आजारी पडलो तर आपणच पैसे देऊन डॉक्टरवर विश्वास ठेवतो, याचे कारण असे की, आपल्याला जगायची इच्छा आहे.

तसे, भगवंताच्या प्राप्तीची तळमळ असेल तर मनुष्य त्याचे नाम घेतल्याशिवाय राहणार नाही.

आधी श्रद्धा, मग कृती, आणि नंतर कृतीच्या फलाचा



अनुभव, असा व्यवहाराचा नियम आहे. परमार्थामध्ये आपण त्याच मार्गाने जावे. व्यवहारात तुम्ही एकमेकांवर जेवढी निष्ठा ठेवता तेवढी जर भगवंतावर ठेवलीत, तरी भगवंत तुम्हाला खात्रीने समाधान देईल.

आगगाडीत ड्रायव्हरवर विश्वास ठेवून आपण स्वस्थ झोप घेतो, त्याप्रमाणे भगवंतावर श्रद्धा ठेवून काळजी न करता आपण स्वस्थ रहावे. ड्रायव्हरपेक्षा भगवंत नक्कीच श्रेष्ठ आहे. परमार्थात अंधश्रेद्धेची मुळीच गरज नाही, पण तिथे श्रद्धेशिवाय मात्र मुळीच चालावयाचे नाही.

सांगणारा कसाही असला तरी ऐकणार्याची जर खरी श्रद्धा असेल; तर त्या श्रद्धेनेच त्याच्याअंगी पात्रता येईल. संतांच्या सांगण्यावर पूर्ण श्रद्धा ठेवावी. अशी श्रद्धा असणे ही फार भाग्याची गोष्ट आहे. खरे म्हणजे अशी श्रद्धा ज्याला लाभली, तो लवकर सुखी झाला.

आज आपल्यापाशी ती नाही, तर निदान आपण स्वतःशी प्रामाणिक बनू या. आधी पुष्कळ चिकित्सा करून आपले ध्येय ठरवावे, पण एकदा ते ठरले की मग निश्चयाने आणि श्रद्धेने त्याच्या साधनात राहावे.

आपण परमात्म्याजवळ मागावे की, "तू वाटेल त्या स्थितीत मला ठेव, पण माझे समाधान भंगू देऊ नकोस. माझा मीपणा काढून टाक. तुझा विसर पडू देऊ नकोस. मला अमुक एक तुजजवळ मागावे अशी इच्छा देऊ नकोस. नामामध्ये प्रेम दे, आणि तुझ्या चरणी दृढ श्रद्धा सतत टिकू दे."

# मोलखेडा-हिवरी येथे येणारी विद्यार्थ्यांची लालपरी हरवली!

## विद्यार्थी म्हणे वडिलांना; आता बाबा मी कसं जाऊ शाळेला?

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा, हिवरी येथे सकाळी नऊ वाजता येणारी लालपरी ही दोन वर्षांपासून बंदच असल्यामुळे ती तात्काळ चालू करावी अन्यथा आम्ही आगारासमोरच उपोषणाला बसणार असे निवेदन आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांच्याकडे मोलखेडा हिवरीचे सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर वारंगणे व अमोल शेळके यांनी दिले आहे.

कोरोनाच्या दोन वर्षाच्या काळात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस ग्रामीण भागात चालू नसल्यामुळे विद्यार्थी व नागरीकांची गैरसोय होत आहे. गेल्या ५० वर्षापासून राज परिवहन महामंडळाची सुरू असलेली सोयगांव ते मोलखेडा ही बस सावळदबारा येथे येऊन घाणेगांव तांडा वरुन सोयगावंला परत जाते पण मोलखेडा येथे येत नाही. आगार प्रमुख हिरालाल ठाकरे याच्यांकडे अनेक ते निवेदने देऊनही जाणूनबुजून हे आगार प्रमुख झोपेचे सोंग घेत आहे. हिवरी व मोलखेडा विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी चार किलोमीटर प्रवास पायी करून घाणेगांव तांडा यावे लागत आहे. त्यांना कोरोनाच्या अगोदर ही बस ह्याच सोयगाव हुन सावळदबारा व मोलखेडा येथे येत होती. मोलखेडा येथील काही विद्यार्थी तोरनाळा, देवळगांव (गुजरी) व फत्तेपुर येथे न्यू इंग्लिश स्कूल हायस्कूलला जात असतात. त्यामुळे त्यांना शाळेत जाण्या येण्यासाठी ती गाडी नाही.

या भागातील विद्यार्थ्यांना बससेवा चालू करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. ते विद्यार्थी घरी बापाला म्हणतात की, "बाबा आता कसे होणार शिक्षण मुलींचे? असा प्रश्न उपस्थित पालकांना केला जात आहे. "मुलगी शिकली प्रगती झाली" असे म्हटल्या जाते पण आज शासनाचे सर्वच ध्येयधोरणे कागदावरच दिसतात. कोरोनाच्या काळात आनलाईन शिक्षणामुळे मुला-मुलींचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे. मुलींना पुढील शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

मोलखेडा गावात पाचवी पर्यंत शाळा आहे. काही मुले सोईनुसार नातेवाईकांकडे शिक्षण घेण्यासाठी गेले आहे. मुलींच्या टिसी शाळेतून काढून घरात पडल्या आहेत. येण्या जाण्याची गैरसोय आहे. बस सेवा चालू करावी, असे निवेदने मोलखेडा हिवरीचे जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे तथा सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर वारंगणे व व अमोल शेळके ग्रा.प.सदस्य, अतुल इंगळे यांनी आगार प्रमुख सोयगाव यांच्याकडे देण्यात आली आहे. ते त्यांच्या निवेदनात म्हणतात की, या पंधरा ते वीस दिवसात आमच्या मोलखेडा हिवरी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी बससेवा सुरु केली नाही तर आम्ही विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक, नागरिक सोयगाव आगारासमोरच प्राणांतिक उपोषणाला बसणार आहे, असे जेष्ठ नागरिक रामभाऊ वारंगणे यांनी दिलेल्या तक्रार निवेदनात नमुद केले आहे.

# क्रांती दिनानिमित्त देशभक्तीपर 'त्रिवेणी'चा अनोखा प्रयोग आज

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त क्रांती दिनाच्या औचित्याने येत्या ९ ऑगस्ट रोजी अनुनाद कलाविष्कार बहुउद्देश्यीय संस्थेतर्फे नृत्य, नाट्य, निवेदनात्मक 'त्रिवेणी' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्यसंग्रामात अनेक महिलांनी योगदान दिले आहे, क्रांतीकारकांच्या योगदानाबद्दल त्यांच्या स्मरणार्थ देशभक्तिने ओतप्रोत या कार्यक्रमात सावरकर घराण्यातील महिलांच्या स्वातंत्र्य समरातील महत्कार्य विशद करण्यात आले आहे. बाबाराव सावरकरांच्या पत्नी यशोदाबाई, विनायकराव सावरकरांची पत्नी यमुनाबाई आणि नारायणराव सावरकरांच्या पत्नी शांताबाई यांचा अलौकिक असामान्य जीवन प्रवास, त्यांचा देशासाठीचा त्याग, समर्पण या कार्यक्रमातून मांडण्यात आला आहे. आजच्या पिढीला, सामान्य व्यक्तिंना या तिन्ही महिलांचं खडतर जगणं समजून देशप्रेमाची मशाल जनमानसाच्या मनात प्रज्वलित व्हावी या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला अशा प्रकारचे कार्यक्रम ही समाजाची आवश्यकता आहे, अशी माहिती संस्थेच्या सचिव राजश्री पोहेकर यांनी सांगितली. त्रिवेणीच्या पहिल्या प्रयोगाचे उद्घाटन गेल्या २६ जूनला यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड यांच्या हस्ते झाले. पहिल्या यशस्वी प्रयोगानंतर आता क्रांती दिनानिमित्त दुसरा प्रयोग जिल्हाधिकारी डॉ.सुनील चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या प्रा. डॉ.प्रीती पोहेखर यांनी संहिता लेखन केले असून राजश्री पोहेकर-कुलकर्णी यांनी नाट्य नृत्य दिग्दर्शन केले आहे. निरंजन भालेराव यांच्या बासरीवादनाची प्रसंगांना जोड मिळाली आहे. अभिनेता तेजस महाजन यांनी सावरकराची भूमिका कसदार अभिनय करत साकारली आहे. सावरकरांनी लिहीलेल्या काही दुर्मिळ गीतांवर लोभस नृत्य सादरीकरणाने एकूणच कार्यक्रम रसिकांच्या मनाचा वेध घेतो. देशप्रेम, स्त्रीशक्ति आणि मराठी भाषा संवर्धन हे पैलू त्रिवेणी मधून दिसतात, त्यामुळे त्रिवेणी हा कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा, सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या कार्यक्रमाच्या आयोजन ९ ऑगस्ट मंगळवार रोजी सायंकाळी ६ वाजता संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा इथे हा कार्यक्रम होणार आहे. शहरातील जवळपास २५ कलाकार कार्यक्रमात सादरीकरण करणार आहेत.



यशोदा गणेश सावरकर | यमुना विनायक सावरकर | शांताबाई नारायण सावरकर

# स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त नाथसागरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** देशातील सर्वात मोठे मातीचे धरण म्हणून ख्याती असलेल्या जायकवाडी प्रकल्पावर भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त नाथसागरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी उपकार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग बुधवंत यांना आज पैठण शहर व्यापारी महासंघ व उद्यान बचाव समितीतर्फे निवेदन देऊन करण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभर देशाच्या वैभवात भर घालणाऱ्या ऐतिहासिक वास्तु, आधुनिक अभिमान वाटावा अशी स्थळे, प्रेक्षणीय स्थळे, स्मृति स्थळे आदी ठिकाणी विद्युत रोषणाई झाली आहे व होत आहे.

आपल्या पैठण येथील आशिया खंडात सर्वात मोठे मातीचे धरण असलेले जायकवाडी धरणावर सुध्दा याच धर्तीवर विद्युत रोषणाई झाली पाहिजे, अशी सर्व सामान्य नागरिक व पर्यटन प्रेमी यांची आग्रही मागणी आहे.

महाराष्ट्र राज्याची पर्यटनाची राजधानी म्हणून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला मान्यता मिळाली असून त्याच जिल्ह्यातील पैठण शहरात सर्वात मोठे पर्यटन क्षेत्र असून राज्यातील आणि देशातील असंख्य पर्यटक, भाविक येथे वर्षभर भेट देत असतात आणि आपण अशात देशाच्या अमृत महोत्सव साजरा करताना धरणावर विद्युत रोषणाई केली तर निश्चितच ती सर्वांना पर्यटनाची पर्वणीच ठरणार आहे. तसेच पर्यटक जर विद्युत रोषणाई बघण्यासाठी आले तर निश्चितच त्याचा फायदा स्थानिक बाजारपेठेस व छोट्या मोठ्या व्यापारी यांना होणार आहे. यासंदर्भात लवकरच पैठणचे आमदार संदीपान भुमरे यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचे निवेदन देऊन पाठपुरावा करणार असल्याचे पैठण शहर व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाने सांगितले आहे.

यावेळी पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, प्रा.संतोष गव्हाणे, पत्रकार रमेश लिंबोरे, स्वदेश पांडे, बाळासाहेब पठाडे, योगेश लोहिया, उमेश तट्टू, बाळासाहेब आहेर, सोमनाथ परळकर आदी उपस्थित होते.



# कन्नड तहसील कार्यालयाकडून अमृत महोत्सवाला सुरुवात



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** भारत स्वतंत्र होऊन 75 वर्ष पुर्ण झाल्याने अखंड भारत हा अमृत महोत्सव साजरा होणार आहे. 75 वर्ष पुर्ण झाल्याने तालुका पातळीवर घर घर तिरंगा 15 ऑगस्ट रोजीपर्यंत स्वयम स्फुर्तीने करावा, याच स्वातंत्र्य महोत्सवानिमित्त शहर व तालुक्यात विविध कार्यक्रम होणार असून कन्नड शहरातील क्रिडा संकुलनात वृक्षारोपण मंगळवार रोजी नवोदय विद्यालयामध्ये सकाळी राष्ट्रगाण होणार असून स्टेडियम परिसरात वृक्षारोपण होणार आहे. दि.14 रोजी प्रसिध्द लेणी पितळखोरा येथे नागरिक व प्रशासन यांच्याकडून स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेस सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा तसेच जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून एकात्मिक आदिवासी प्रकल्प औरंगाबाद व कन्नड महसूल प्रशासन यांच्या संयुक्तांने पुर्णा काकु प्रबोधनी येथे आदिवासी पारंपारिक नृत्य व गायक राहुल खरे यांचे मधुर गाण्यांचे आयोजन केले आहे. याच अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा होणार असून यांचे बक्षीस वितरण व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार सुद्धा करण्यात येणार आहेत म्हणूनच भारत स्वतंत्र होऊन 75 वर्ष पुर्ण झाल्याने कन्नडमध्ये अमृत महोत्सव साजरा होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते यांनी पत्रकार परिषदेमध्ये बोलताना म्हणाले.

यावेळी तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, नगरपालिका मुख्य अधिकारी नंदकिशोर भोंबे, मंडळ अधिकारी सतीश भदाणे, गटशिक्षण अधिकारी दिलीप शिरसाठ, तलाठी अशिष सुरपम, महसूल सहाय्यक कुणाल दाभाडे, अ.का. सत्तेजित अव्हाड, जगदीश चव्हाण, जवाहर नवोदय विद्यालय कन्नड शारीरिक शिक्षक संजय इंगल्स, सहशिक्षक कुणाल कुमार, धनंजय बिडवे, बँड पथक, तसेच एनसीसी विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# व्यंकटेश कान्हेरे ठरला सर्वोत्कृष्ट वक्ता

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** स्व.डॉ. चंपलाल देसरडा ह्यांच्या जन्मदिनानिमित्त घेण्यात आलेल्या संस्कृत वक्तृत्व स्पर्धेत होली क्रॉस इंग्लिश हायस्कूलचा विद्यार्थी व्यंकटेश कान्हेरे सर्वोत्कृष्ट वक्ता ठरला. डॉ. देसरडा पब्लिक शाळेत सदरील स्पर्धा पार पडली. तीन विविध गटांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. त्यात तिसरा गट आठवी ते दहावीचा होता. विविध शाळांमधील जवळपास ५२ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. या सर्वांत व्यंकटेश उजवा ठरला. प्रा.डॉ. पंकजा वाघमारे ह्यांच्या हस्ते त्याला स्मृतिचिन्ह, पुस्तके व प्रमाणपत्र प्राप्त झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी, पर्यवेक्षक मोहम्मद हाफिज, सर्व शिक्षक वृंद इत्यादींनी व्यंकटेशचे अभिनंदन केले. त्याला संस्कृत शिक्षक गिरीश जोशी, अनिरुद्ध महाजन ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

# मेहकर रोडवर सळई घेऊन जाणारा ट्रॅक्टर पलटी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** दि.७ ऑगस्ट रोजी लोणार येथून पारडी शिरसाट येथील गजानन शिरसाट यांच्या २ टन सळई घेऊन ट्रॅक्टर जात असताना लोणार मेहकर रोडवर मागुन आलेल्या मोटरसायकलने ओव्हरटेक करताना अचानक ब्रेक मारल्यामुळे ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी झाल्यामुळे ट्रॉलीमधील असलेल्या दोन टन सळई या रोडवर पडला. परंतु कोणत्याही प्रकारची जीवित हानी सुदैवाने झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच राहुल मापारी, अंबादास इंगळे हे घटनास्थळी पोहोचले व त्यांची मदत करून जाणारे येणाऱ्यांना रस्ता मोकळा करून दिला.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016



## ‘हर घर तिरंगा’ मोहीम

आधुनिक केसरी

भारत यंदा स्वातंत्र्याचा ७५ वा महोत्सव साजरा करणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व भारतीयांना ‘हर घर तिरंगा’ मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ही मोहीम म्हणजे आजादी का अमृत महोत्सवमधील महत्वाचा भाग आहे. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत देशभरामध्ये वेगवगेळ्या कार्यक्रमांचे आयोजन सरकारच्या माध्यमातून करण्यात आले आहे. भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित हा उत्सव १३ ते १५ ऑगस्टदरम्यान साजरा होणार असला तरी ‘हर घर तिरंगा’ मोहिमेला २ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. हर घर तिरंगा मोहिमेचा महत्वाचा हेतू हा लोकांनी त्यांच्या घरावर राष्ट्रध्वज फडकवावा असा आहे. ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वांनी आपआपल्या घरांवर तिरंगा फडकवावा या हेतूने सरकारने ही मोहीम सुरु केली असून या माध्यमातून देशभक्तीची भावना जागृत करण्याचा प्रयत्न आहे. तसेच या माध्यमातून भारतीय झेंड्यासंदर्भातील वेगवेगळ्या गोष्टी अधिक अधिक लोकांना जाणून घ्याव्यात असा सुद्धा हेतू आहे. या मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २ ऑगस्ट २०२२ रोजी देशातील लोकांना त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरील डिस्प्ले फोटो म्हणजेच डीपी म्हणून तिरंग्याचा फोटो ठेवण्याचे आवाहन केले. याशिवाय देशातील शैक्षिणक संस्थांनी ‘हर घर तिरंगा’ प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा आणि इतर स्पर्धांचे आयोजन करणार आहेत ज्या माध्यमातून मुलांच्या मनात देशभक्तीची भावना निर्माण होईल. आपल्या घरी झेंडा लावताना सर्वांनीच झेंड्यासंदर्भातील नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. उदाहरण द्यायचे झाले तर झेंड्यासंदर्भातील २००२ च्या सुधारित नियमांनुसार राष्ट्रध्वज हा उलटा फडवला जाऊ नये. राष्ट्रध्वज जमिनीवर पडता कामा नये. राष्ट्रद्धवज फाटलेला किंवा मळलेला असू नये. याशिवाय राष्ट्रध्वजाचा वापर अंगाभोवती गुंडाळण्यासाठी करु नये. त्याचप्रमाणे राष्ट्रध्व रुमालांवर छापण्यासाठी किंवा कपड्यांवर छापू नये. आपल्या घरात लावलेल्या झेंड्याचे फोटो नागरिकांना हर घर तिरंगा डॉट कॉमवर अपलोड करता येतील. याच वेबसाईटवर नागरिकांना या मोहिमेमध्ये सहभागी झाल्याबद्दल प्रमाणपत्रही डाऊनलोड करता येईल. १ ऑगस्टच्या आकडेवारीनुसार ५० लाखांहून अधिक झेंडे छापून झाले असून या वेबसाईटवर तिरंग्यासोबत सात लाखांहून अधिक लोकांनी सेल्फी फोटो अपलोड केलेत. काही राज्यांत स्थानिक राज्य सरकारांनी या मोहिमेला समर्थन दर्शवताना ती यशस्वी होण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. महाराष्ट्र सरकारने स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी राज्यातील सरकारी सहकारी संस्थांना प्रत्येक सोसायटीमध्ये झेंडावंदन करण्यासंदर्भातील निर्देश दिलेत. सर्व सरकारी आणि निमसरकारी इमारतींनाही हाच नियम लागू करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त उत्तर प्रदेशमधील आग्रा येथील २० कोटी घरांवर झेंडा फडकवण्यात येईल असे सांगण्यात आले. बोंगनगाव येथील कारखान्याला योगी सरकारने झेंडे बनवण्यासंदर्भातील कंत्राट दिले असून एवढ्या मोठ्या प्रमाणात झेंडे तयार करण्यासाठी या कारखान्यामध्ये दिवस-रात्र काम सुरु आहे.

## तिरंग्याचा सन्मान



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**समाजामध्ये संभ्रम निर्माण करणारे घटक वारंवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या देशभक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत असतात. परंतु सर्वसामान्य समाज 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला भारत माता की जय म्हणतो परंतु संघाचा स्वयंसेवक दररोज शाखेमध्ये गेल्यावर प्रार्थनेमध्ये भारत माता की जय म्हणतो. त्यामुळे भारत मातेबद्दल, तिरंग्याबद्दल देशाच्या क्रांतिकारकांबद्दल, देशाबद्दल त्याच्या मनामध्ये आपोआपच सन्मान निर्माण होतो. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला तुम्ही तिरंग्याचा सन्मान करता की नाही असा प्रश्न विचारणे चूक आहे. असे विचारणाऱ्या लोकांनी आपली देशभक्ती तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.**

सध्या समाज माध्यमांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तिरंग्याचा सन्मान करतो की नाही याबद्दल अनेक उलट सुलट चर्चा सुरू आहेत. वास्तविक पाहता पूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या 2018 यावर्षीच्या भाषणाचा व्हिडिओ समाज माध्यमांवर टाकून याला उत्तर दिले गेलेले आहे. परंतु ही चर्चा काही नवीन नाही. समाजामध्ये संभ्रम निर्माण करणारे घटक वारंवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या देशभक्त संघटनेची बदनामी करण्यासंदर्भात अशा पद्धतीच्या खोडसाळ प्रचार नेहमीच करीत असतात. अशा प्रचाराला उत्तर देण्याची आवश्यकता असतेच.
स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवामध्ये संपूर्ण देशभर संघासारखी देशभक्त संघटना अनेकानेक देशभक्ती पूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करीत आहे. सर्वसामान्य समाज जो संघाला दुरून ओळखतो तो अशा कार्यक्रमांच्या द्वारा संघाच्या कामांमध्ये हळूहळू सहभागी होत असतो. परंतु तिरंग्याबद्दल प्रत्येकच भारतीयाच्या मनात अभिमानाची भावना असते. त्यामुळे अशा पद्धतीचा खोडसाळ प्रचार जर केला गेला तर एखाद्या नवीन माणसाच्या मनामध्ये संघाच्या भूमिकेबद्दल प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे त्याचा संघामध्ये प्रवेश, संघाच्या कामामध्ये सहभाग हा विलंबाने होऊ शकतो. हे सर्व होऊ नये यासाठीच संघ आणि राष्ट्रध्वज तिरंग्याबद्दल त्याची भूमिका ही समजावून घेणे खूपच आवश्यक आहे.
स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीमध्ये सुरू होते. नेहमीप्रमाणे ध्वजारोहण सुरू होते. शेकडो लोकांच्या उपस्थितीत हे ध्वजारोहण सुरू असताना तिरंगा ध्वज काही अंतर सरळ वर गेला व त्यानंतर अडकला. तो वर जाईना व खाली पण येईना अशा परिस्थितीत सगळे लोक आवासून त्या तिरंग्याकडे पाहत होते. तिरंगा वर न चढणे व गुंतून राहणे हा तिरंग्याचा एक प्रकारे अपमानच होता. अशा परिस्थितीमध्ये काय होईल याची चिंता लोकांच्या मनामध्ये असताना एक तरुण गर्दीतून बाहेर आला व 80 फूट उंच त्या स्तंभावर चढू लागला. तो तरुण त्या ध्वजापर्यंत पोहोचला त्याने जी गाठ पडलेली होती ती सोडविली व तिरंगा डौलाने पुन्हा फडकण्यासाठी वर चढला. तो तरुण खाली उतरल्यावर ध्वजारोहणाच्या नंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्या तरुणाचे खूप कौतुक केले. काँग्रेस त्या तरुणाचा सत्कारही करणार होती. परंतु जेव्हा त्यांना समजले की तो तरुण म्हणजे किशनसिंग राजपूत आहे व तो संघाचा स्वयंसेवक आहे. नियमित शाखेत जाणारा आहे त्यावेळेस त्याचा सत्कार करण्याचा कार्यक्रम काँग्रेसने सोडून दिला. काँग्रेसने जरी त्याचा सत्कार केला नाही तरीही संघ संस्थापक पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांनी मात्र त्याला एक चांदीचा छोटा तांब्या भेट देऊन त्याचा सत्कार केला. आता या उदाहरणामध्ये आपण लक्षात घेतले पाहिजे की शेकडो लोक काँग्रेसच्या अधिवेशनात उपस्थित होते. हे सर्वच लोक देशभक्त होते. पण यापैकी एकालाही आपण ध्वजस्तंभावर चढून त्या ध्वजाला पडलेली गाठ सोडविली पाहिजे असे का वाटले नाही? परंतु संघाने कधीही काँग्रेस तिरंग्याचा सन्मान करते की नाही हा प्रश्न विचारला नाही. काँग्रेसच्या कार्यपद्धतीत कुठेतरी कमतरता आहे का? हा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. काँग्रेसची देशभक्ती ही फक्त 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला भारत माता की जय म्हणणे इतकीच आहे



का? असाही प्रश्न पडतो. वास्तविक किशनसिंग राजपूत याच्या मनामध्ये तिरंग्याचा सन्मान झाला पाहिजे यासाठी मी स्वतःहून चढलं पाहिजे ही भावना कशी काय आली? याला कारण म्हणजे संघाच्या शाखेमध्ये दररोज प्रार्थनेमध्ये भारत माता की जय म्हटले जाते. सर्वसामान्य समाज 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला भारत माता की जय म्हणतो परंतु संघाचा स्वयंसेवक दररोज शाखेमध्ये गेल्यावर प्रार्थनेमध्ये भारत माता की जय म्हणतो. त्यामुळे भारत मातेबद्दल, तिरंग्याबद्दल देशाच्या क्रांतिकारकांबद्दल, देशाबद्दल त्याच्या मनामध्ये आपोआपच सन्मान निर्माण होतो. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला तुम्ही तिरंग्याचा सन्मान करता की नाही असा प्रश्न विचारणे चूक आहे. असे विचारणाऱ्या लोकांनी आपली देशभक्ती तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.
1930 साली लाहोर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारित करण्यात आला. त्यावेळेस देशभरातील सर्व संघ शाखांनी तिरंगा ध्वजासह पथसंचलनाचे कार्यक्रम केले व काँग्रेसच्या अभिनंदनचा ठराव सुद्धा पारित केला. यावरून आपण लक्षात घेतले पाहिजे की काँग्रेस असो वा अन्य कोणी देशाच्या स्वाभिमानासाठी, सन्मानासाठी जर कोणी चांगले काम केले तर संघ त्याला निश्चितच समर्थन देईल व त्यामध्ये सहभाग घेईन.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा ही घोषणा केली. ही घोषणा संपूर्ण देशासाठी आहे. प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा लावणे हा प्रत्येकासाठी स्वाभिमानाचा विषय असला पाहिजे. हा काही भाजपचा विषय नाही. परंतु काँग्रेस याला भाजपाशी जोडत आहे. म्हणजे प्रत्येक घरावर तिरंगा लागल्याने जर देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले तर त्याचा फायदा भाजपाला मिळेल असे काँग्रेसला का वाटत असते? वास्तविक काँग्रेस हा स्वातंत्र्या पूर्वीपासून देशासाठी काम करणारा पक्ष आहे. मग जनतेमध्ये तिरंग्याचा सन्मान व देशभक्ती जागृत झाली तर त्याचा फायदा काँग्रेसला का मिळणार नाही? काही लोक मोटरसायकल रॅलीचेही आयोजन करत आहेत. त्यालाही काँग्रेसने भाजपाशी जोडलेले आहे. वास्तविक पाहता काँग्रेसने जर तिरंगा घेऊन मोटरसायकल रॅलीचे आयोजन केले तर लोक म्हणतील काँग्रेसने आयोजन केले. त्याचा फायदा काँग्रेसलाही मिळू शकेल. परंतु खुद्द काँग्रेसला तसे वाटत नाही. देशभक्ती व भाजपा हे समीकरण झालेले आहे असेच काँग्रेसला वाटते आहे. आणि ही निश्चितच चांगली गोष्ट आहे.
पूर्वी संघाच्या कार्यालयावर 15 ऑगस्ट 26 जानेवारीला राष्ट्रध्वज फडकविला जात नव्हता.त्याचे कारण म्हणजे संघाचे कार्यालय हे इतर संस्थांच्या संघटनांच्या कार्यालयांसारखे नाही. ते तेथे राहणाऱ्या अनेक वृद्ध तसेच व्यवस्थेमधील प्रचाराकांचे घर असते. पूर्वी ऑफिसेस वर तिरंगा लावला जात होता घरांवर नाही. तिरंगा फडकविण्याचे काही नियम होते. याविषयीचा वाद निर्माण झाल्यानंतर संघानेही आपल्या सर्वच देशभरातील कार्यालयांमध्ये तिरंगा फडकविणे सुरू केले. संघाच्या मनात तिरंग्याबद्दलचा सन्मान होता, आहे व राहणार आहे. कारण तो आमचा राष्ट्रध्वज आहे. व संघाचे स्वयंसेवक हे राष्ट्राच्या कामासाठी कटीबद्ध होण्यासाठीच संघाचे स्वयंसेवक बनलेले असतात. त्यामुळे तिरंग्याचा सन्मान ते करतातच याबद्दल कुठलीही शंका नाही.
पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संघाचे स्वयंसेवक आहेत. त्या अनुसरूनच त्यांनी हर घर तिरंगा ही घोषणा केलेली आहे. संघाचे स्वयंसेवक आपापल्या घरांवर तिरंगा ध्वज लावतीलच परंतु काँग्रेस व याबद्दल वाद निर्माण करणाऱ्या लोकांनी आपापल्या घरांवर तिरंगा ध्वज लावून स्वतःच्या देशभक्तीचे प्रदर्शन करावे याची जास्त आवश्यकता आहे.

## मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**ज्या देशामध्ये महिलांना देवीचा दर्जा देऊन पुजले जाते त्या देशातील महिलांना बलात्कार करून करून मारले जाते याला काय म्हणावे? महिलांना केवळ देवीचा दर्जा देऊन त्यांच्यावरील अत्याचार थांबणार नाही. बलात्कार करणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा व्हायला हवी. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी सरकारने जलदगती न्यायालये उभारले आहेत. अल्पवयीन मुला मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचार विरोधी कायद्यातही (पोक्सो) सरकारने दुरुस्ती केली आहे. या गुन्ह्यांच्या प्रकरणामध्ये गुन्हेगारांना फाशीच्या शिक्षेचीही तरतूद करण्यात आली असून या संदर्भातील खटल्याची सुनावणी विशेष न्यायालयामध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे असूनही लैंगिक अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाही उलट वाढतच आहे.**

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्रात महिला सुरक्षित आहेत का ? असा प्रश्न महाराष्ट्राला पडला आहे. कारण महिला अत्याचारांच्या घटनेत राज्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे. महिला अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकत आहे. महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या दोन घटना महाराष्ट्रात नुकत्याच घडल्या. भंडारा येथे एका ३५ वर्षीय महिलेवर तीन नराधमांनी बलात्कार करून तिला रस्त्याच्या कडेला फेकून दिले तर दुसऱ्या एका घटनेत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात एका सात वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला इतकेच नाही, तर नंतर या सात वर्षीय मुलीची हत्याही करण्यात आली. मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनांनी संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेत दोषी असलेल्या नराधमांना शोधून त्यांना जाहीर फाशी द्यावी अशी मागणी होऊ लागली. महिला तसेच अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याची ही देशातील पहिलीच घटना नाही. याआधीही अशा अनेक घटना घडल्या आहेत. २०१२ साली दिल्लीत झालेल्या निर्भया हत्याकांडाने तर संपूर्ण देश हादरून गेला होता. त्याच घटनेची आता पुण्यातील मावळ तालुक्यात पुनरावृत्ती झाली आहे. केवळ केवळ भंडारा किंवा मावळमध्येच नाही तर देशभर अशा मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. २०१३ साली मुंबईतील शक्ती मिलमध्ये बलात्काराचा भयाण प्रकार घडला. २०१४ साली बदायु येथे अशीच घटना घडली. २०१६ मध्ये नगर जिल्ह्यातील कोपर्डी येथील घटनेने तर मानवतेनेच खाली मान घातली. कोपर्डी घटनेने समाजमन जागृत झाले. लाखोंचे मोर्चे निघाले पण अत्याचाराच्या घटना थांबल्या नाहीत. २०१७ मध्ये उन्नाव आणि हैदराबाद मधील डॉक्टर तरुणीवर झालेल्या सामूहिक अत्याचाराने देश हळहळला. त्यानंतर उत्तर प्रदेश मधील हातरस व महाराष्ट्रातील हिंगणघाट येथेही अशाच सामूहिक बलात्काराच्या घटना घडल्या. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनांची यादी मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच चालली आहे. मागील दहा वर्षात देशातील सामूहिक बलात्काराच्या घटनेत ३१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. बलात्काराच्या घटनेत अशी वाढ होणे ही चिंताजनक बाब आहे. पोक्सो



कायद्याअंतर्गत खटल्यांमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्ह्यांमध्ये वाढ होणे हे देशातील अल्पवयीन मुली सुरक्षित नसल्याचेच लक्षण आहे. देशात आज कोणतीच महिला सुरक्षित नाही, मग ती तीन वर्षाची चिमुरडी असोत की साठ वर्षाची आजी. घर, शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणे इतकेच काय तर पोलीस स्टेशनमध्येही महिला सुरक्षित नाहीत. ज्या देशामध्ये महिलांना देवीचा दर्जा देऊन पुजले जाते त्या देशातील महिलांना बलात्कार करून करून मारले जाते याला काय म्हणावे? महिलांना केवळ देवीचा दर्जा देऊन त्यांच्यावरील अत्याचार थांबणार नाही. बलात्कार करणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा व्हायला हवी. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी सरकारने जलदगती न्यायालये उभारले आहेत. अल्पवयीन मुला मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचार विरोधी कायद्यातही (पोक्सो) सरकारने दुरुस्ती केली आहे. या गुन्ह्यांच्या प्रकरणामध्ये गुन्हेगारांना फाशीच्या शिक्षेचीही तरतूद करण्यात आली असून या संदर्भातील खटल्याची सुनावणी विशेष न्यायालयामध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे असे असूनही लैंगिक अत्याचाराच्या घटना कमी होताना दिसत नाही उलट वाढतच आहे. रोजचे वर्तमानपत्र उघडले की बलात्कार, विनयभंगाची एक तरी बातमी वाचायला मिळतेच. नराधमांना कायद्याचा धाक उरला नसल्याचेच हे लक्षण आहे. महिलांकडे बघण्याची पुरुषी मानसिकता बदलत नाही त्यामुळेच या घटना थांबत नाही. कायद्यासोबतच महिलांकडे उपभोगण्याची वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता बदलणेही तितकेच गरजेचे आहे. ही मानसिकता बदलणे हेच समाजापुढील मोठे आव्हान आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# ज्ञानगंगेच्या विस्तारासाठी ग्रंथालयाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले पाहिजे

सुनिल सिरसाट
संपर्क क्र. : 9422742442

आधुनिक केसरी

**मंदिराच्या संदर्भात आपल्या मनात जी सकारात्मकता असते, भावनिकता असते, आत्मियता असते तीच ग्रंथालयाच्या संदर्भात असली पाहिजे. तीच काळजी, तेच पावित्र्य सांभाळलं गेलं पाहिजे. तोच दानशूरपणा ह्या या संदर्भात सुद्धा निर्माण झाला पाहिजे. जगात असणा-या वेगवेगळ्या संपदांपैकी ज्ञानसंपदा ही सर्वश्रेष्ठ संपदा आहे....! आणि ज्याठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीचे ज्ञानग्रंथ एकत्र संग्रह करून वाचणासाठी ठेवले ते ग्रंथालय तर किती महान असले पाहिजे. तसं पाहिलं तर ग्रंथालये ही ज्ञानाचे भांडारच आहेत. आणि ज्ञानभांडार जितकी जास्त तितकाच तो समाज सदन म्हणून गणला जातो. म्हणून ही ज्ञानभांडारे वाढली पाहिजेत.**

ज्ञानाच्या गंगेचा विस्तार आणि विकास जितका जास्त तितक्या विराट प्रमाणात सामाजिक विकासाला गतिमानता येईल. ग्रंथालय हे सामाजिक उन्नतीचं ज्ञान मंदिर आहे अस जरी म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आणि मग त्याच पद्धतीने त्याच महत्व आणि मुल्य जपलं गेलं पाहिजे, वृद्धींगत झालं पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ग्रंथालय हे लोकोतर चळवळ होऊन ज्ञानाची गंगा गावागावात, वाडी-वस्ती-तांड्यावर-घराघरात पोहचण्यासाठी प्रत्येकाने आपलं अनमोल योगदान दिले पाहिजे. ते योगदान उदात्त हेतूने लोकचळवळ मजबूत होईल या पद्धतीने दिलं पाहिजे. ग्रंथालयाची निश्चितच व्याप्ती वाढली पाहिजे. ग्रंथालय हे फक्त नावासाठी नाही तर ज्ञानदालन म्हणून नावारूपाला आल पाहिजे. शासनातर्फे मदत किंवा सहकार्य ही बाब फार महत्वपूर्ण नसुन लोकउत्थान होण्यासाठी ज्ञानाची व्याप्ती वाढवण्यासाठी आणि लोकांच्या स्व-काळजीतुन, स्व-हितासाठी ग्रंथालयांची उभारणी झाली पाहिजे. मंदिराच्या संदर्भात आपल्या मनात जी सकारात्मकता असते, भावनिकता असते, आत्मियता असते तीच ग्रंथालयाच्या संदर्भात असली पाहिजे. तीच काळजी, तेच पावित्र्य सांभाळलं गेलं पाहिजे. तोच दानशूरपणा ह्या या संदर्भात सुद्धा निर्माण झाला पाहिजे. जगात असणा-या वेगवेगळ्या संपदांपैकी ज्ञानसंपदा ही सर्वश्रेष्ठ संपदा आहे....! आणि ज्याठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीचे ज्ञानग्रंथ एकत्र संग्रह करून वाचणासाठी ठेवले ते ग्रंथालय तर किती महान असले पाहिजे. तसं पाहिलं तर ग्रंथालये ही ज्ञानाचे भांडारच आहेत. आणि ज्ञानभांडार जितकी जास्त तितकाच तो समाज सदन म्हणून गणला जातो. म्हणून ही ज्ञानभांडारे वाढली पाहिजेत. लोकचळवळ झाली पाहिजे. जेणेकरून प्रगतशील समाज विकसनशील समाज घडविण्याचे कार्य गतिमान होण्यामध्ये



असणारे मुख्य अडथळे दुर होतील आणि ग्रंथालयासारख्या ज्ञान मंदीराचा योग्य विनियोग होईल. आपल्या देशातील प्राचीन संस्कृती पाहिली तर ग्रंथालय हा भारतीय समाज रचनेचा पाया होता. प्राचीन कालखंडामध्ये तत्कालीन परस्थितीमध्ये अनेक विदेशी आक्रमणं झाली. त्यावेळी या आक्रमणकारी लोकांनी आपली पुस्तकालय जाळली. परंतु अशा कठीण कालखंडात सुद्धा आपल्या ऋषी-मुनींनी गुरूकुल शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून मेधावी हुशार शिष्यामार्फत गुरूदक्षिणा म्हणून काही ग्रंथ ज्ञान हे मुखोदगत करून ईतरांना सांगुन त्यांच्याकडुन मुखोदगत करून घेतले. या पद्धतीने ज्ञानाच जतन व संवर्धन केले. आणि विदेशी आक्रमणकारी यांच्यापासुन आपलं ज्ञान सुरक्षित आणि संरक्षित ठेवले. ज्ञान साहित्य ग्रंथ आणि समाज यांचा एकमेकांशी घनिष्ठ असा संबंध असतोच समाजाच्या विकासात ज्ञान आणि ग्रंथ यांच अनमोल योगदान असल्याने ग्रंथालयाला मंदीरा सारखच पवित्र मानले पाहिजे. जस मंदीराचे एक वेगळे पावित्र्य असते. आणि आपण सगळे ते अगदी काटेकोरपणे पाळत असतो. एकंदरीत समाजातील सगळ्या घटाकांवर मंदीराचा जो प्रभाव असतो. त्यामुळंच सामाजिक संस्कार टिकुन असतात. त्याच पद्धतीने समाजाच्या विकासासाठी उन्नती साठी ग्रंथालये अगदी मंदीरासारखीच असतात.

जिथं मंदीराची संख्या जास्त असते ते राज्य, तो देश सामाजिकदृष्ट्या आपली संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी सक्षम असतात.....!!

त्याच पद्धतीने ज्या राज्यात आणि देशात ग्रंथालय जास्त प्रमाणात असतात तिथे समाजिक उन्नती हि जास्त प्रमाणात दिसते. भारतासारख्या विशालकाय देशाला आध्यत्मिक परंपरेचा वसा आणि वारसा असल्याने अगदी प्राचीन कालखंडात सुद्धा आपल्या समाज व्यवस्थेत ग्रंथालयाचा प्रभाव होता. कित्येक ऋषी-मुनींनी लिहलेले आध्यत्मिक ग्रंथ आजही जगासाठी प्रेरणादायी आहेत. मग आपल्या देशातील गावा-गावात खेडोपाडी अगदी लोकचळवळ म्हणून ग्रंथालयं निर्माण झाली तर प्रत्येक व्यक्तीला आपल्या देशातील व विदेशातील वेगवेगळ्या पद्धतीचे तत्वज्ञान वाचण्यासाठी सहज उपलब्ध होईल. वाचन-संस्कृती वाढेल आणि याचा फायदा सामाजिक सांस्कृतीक दृष्टीने समाजाच्या हितासाठी कल्याणासाठी नक्कीच होईल......!!.

**(लेखक पत्रकार तथा अखंड हिंदुराष्ट्र संघटना, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष आहेत.)**



# मैत्रीचे अनुबंध आणि छटा !

रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**मैत्री चे नाते हे मनुष्य जीवनात खरे तर परमेशवराने निर्माण केलेले एक रम्य भावस्वप्न आहे. हे नाते कुणाशी कधी कसे निर्माण होते याला कुठलाच नियम नाही आणि हेच मैत्रीच्या नात्याचे वैशिट्य आहे. समान आर्थिक स्थिती, समान सामाजिक स्थिती वा समान शैक्षणिक, बौद्धिक पातळी असे कुठलेच बंधन मैत्री नावाच्या नात्याला आवश्यक नसतात. मैत्री ही कुठल्याही हेतूने, कृत्रिम पद्धत्तीने निर्माण झाली तर ती काही काळानंतर गळून पडते कारण शाश्वत असा आधार त्याला नसतो. मैत्री होती, मित्र होता असे भूतकाळ वाचक वाक्य रचना मैत्रेयाला मान्य नाही. म्हणूनच मैत्री हे एक असे मनोहर नाते आहे. मैत्रीच्या नात्याचा जन्म माणसाच्या अस्तित्वा बरोबरच निर्माण झाला असावा कारण माणूस जन्मतः समाजप्रिय प्राणी म्हणून ओळखला जातो आणि मैत्रीच्या आधारावरच तो समाजात जोडला गेला.**

आमच्याकडे कृष्ण/सुदामा ही मैत्रीची कथा सर्वदूर प्रसिद्ध आहे. त्यापूर्वी पण रामायण काळात अनेक मैत्रीचे दाखले येतात. त्याकाळी गुरुकुलात बरोबर शिकणारे मित्र विविध सामाजिक स्थितून येत असत पण केवळ सहाध्यायी न राहता मित्र बनत. आम्हाला पण शाळेत असताना प्रथम मित्र आणि मैत्री कळायला लागते आणि महाविद्यालयीन जीवन संपेपर्यंत आमच्या मैत्रीचे संचित समृद्ध बनते.

हिंदी सिनेसृष्टीत ज्यावेळी मानवी भावना आणि नाते संबंध याचा विचार होत होता त्या काळात या नात्यावर आधारित उत्तम कथानके, उत्तम गीते आणि उत्तम सिनेमा निर्माण झाले . या निमित्ताने त्यांचे स्मरण निश्चित होते. दोस्ती, नमक हराम, याराना असे अनेक उदाहरण देता येतील.

दोस्ती मध्ये एक नेत्रहीन आणि एक पायाने अधू अशा दोन मित्रांची अजरामर कथा. लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी अजरामर केलेली महंमद रफी यांच्या आवाजातील गाणी यांनी हिंदी सिनेसृष्टीत मैत्रीवर एक अध्याय लिहला गेला. 'मेरा भी जो भी कदम है, तेरी चाह मे है । किंवा ' चाहूंगा तुझे सांज सबेरे किंवा 'मेरी दोस्ती मेरा प्यार' ही गाणी म्हणजे मैत्रीचा काव्यमय आविष्कार आहे. या गाण्याना संगीत देणारे लक्ष्मीकांत प्यारेलाल हा पण मैत्रीचा एक सांगीतिक अध्यायचं आहे.

नमक हराम हा सिनेमा एका श्रीमंत आणि गरीब मित्रांची गोष्ट. उद्योगपती मित्राच्या मदतीला शहरात त्याच्याच कारखान्यात नकली कामगार नेता बनून त्याचा गरीब मित्र जातो पण नंतर खरोखरच कामगारांच्या प्रश्नाने त्यांचा असली कामगार नेता बनतो.

आणि मग मैत्री संघर्षात बदलते पण शेवटी आपल्या मित्रावर आपल्याच वडिलांनी मारेकरी घातल्यावर त्याचे प्रायश्चित भोगणारा श्रीमंत मित्र अशी अप्रतिम कथा. त्यात राजेश खन्ना आणि अमिताभ बच्चन यांनी आपल्या अभिनयाचे गहिरे रंग भरले. किशोर कुमार, आनंद बक्षी, आर. डी. बर्मन आणि हृषीकेश मुखर्जी, गुलजार यांनी मिळून एक अजरामर कलाकृती निर्माण झाली.

दिये जलते है, फुल खिलते है, बडी मुश्किल से मगर दुनिया मे दोस्त मिलते है ! हे गाणे हिंदी चित्रपटसृष्टीतील मैत्री वरील एक अवीट गाणे आहे. यातील प्रत्येक ओळ मैत्रीच्या भावनांना वाट मोकळी करून देणारी आहे. जगातल्या सगळ्या लौकिक गोष्टी अस्थिर आहेत फक्त मैत्री स्थायी आहे हा त्यातील भाव रंग उड जाते है, रूप ढलते है उम्रभर दोस्त लेकिन साथ चलते है ! या ओळीत व्यक्त होतो.

अशा या मैत्रेयातून प्रत्यक्ष पणे काही निर्मिती पण होतात आणि त्यातून लोककल्याण पण घडत असते, याची अनेक उदाहरण देता येतील !

स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरे आणि स्वर्गीय गो. नी. दांडेकर दोघे जवळचे मित्र. दोघे इतिहास संशोधक ! त्यासाठी दोघेही डोंगर, दरीत भ्रमंती करायचे. त्यांच्या या मैत्रीतून महाराष्ट्राला गड, किल्ले आणि स्वराज्याचा इतिहास माहीत झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र माहीत झाले. गो. नी. दा. लवकर गेले, बाबासाहेब त्यांच्या आठवणीने सदगतीत झालेले अनेकांनी पाहिले होते.

सुधीर फडके आणि ग. दि. माडगूळकर यांची मैत्री अशीच अवीट गीतांची सुरमय निर्मिती करणारी. दोघांनी मिळून अनेक मराठी चित्रपट गीत दिली. ग. दि. मा. यांच्या शब्दांना स्वरबद्ध करण्यासाठी जणू बाबूजी यांची संगीत साधना जन्माला आली असावी असे वाटावे इतके त्यांचे सूर जमले होते. गीत रामायण ही भव्य कलाकृती जन्माला घालणारी त्यांची



मैत्री होती. दोघांचे राजकीय विचार पूर्ण परस्पर विरोधी ! बाबूजी सावरकर भक्त आणि आण्णा माडगूळकर गांधीवादी तरी पण त्यांची मैत्री अभेद्य होती.

क्रांतिकारकांचा इतिहास आपल्याला माहिती आहे पण त्यांच्यातले मैत्रेय पण तसेच विलक्षण होते. भगतसिंग हे सर्वांच्यात अत्यंत बुद्धिमान पण सर्वांच्या गुण, अवगुणांना विचारात घेऊन त्यांनी संघटन उभे केले होते त्याचा आधार होता मैत्री. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव हे तीन ठिकाणचे, विभिन्न परिस्थितीत जन्माला आलेले ! नियतीने स्वातंत्र्यच्या समान उर्मीतून त्यांच्या मैत्रीचा पूल उभा राहिला आणि भारताच्या स्वातंत्र्य युद्धाची एक अजरामर कथा जन्माला आली. त्यांच्यात स्पर्धा होती ती कोण पहिली गोळी सौंडर्सला मारणार ? स्पर्धा होती भारतमातेच्या बलिदान वेदीवर प्रथम कोण समर्पण करणार?

शेवटी आणखी एक मैत्रीची कथा ! भारताचे पंतप्रधान मोदीजी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या मैत्रीची कथा ! सुमारे ३५ वर्षाच्या अखंड राजकीय प्रवासात आलेल्या प्रत्येक संकटात एकमेकांना साथ देणारे मैत्रेय ! सार्वजनिक ठिकाणी त्याचे कुठेही अवाजवी प्रदर्शन न करता परस्परांचा आदर जपणारे आणि एकमेकांच्या कर्तृत्वाला दाद देणारे मैत्रेय ! आजच्या भारताच्या पुनरवैभवाच्या वाटचालीत या दोघांच्या मैत्रीचा मोठा वाटा आहे. अशीच मैत्री राजकीय क्षेत्रात दुर्मिळच पण भारतीयांनी अटलजी आणि अडवाणी यांच्या बाबतीत पण ती ४० वर्षे अनुभवली. मैत्रीत स्पर्धा नसते, असते ती परस्पर पूरकता आणि त्यातून एक भाव विभोर इतिहास निर्माण होत असतो. असा इतिहास निर्माण करणारे मैत्रेय जगण्याचा संकल्प करू या मित्रानो !

## मैत्रीचा रंग

**पानावर साठलेल्या दवबिंदू सम असतो मैत्रीचा रंग
आयुष्याच्या पानावरून निथळणार नाही असा या नात्याचा चंग**

**रोज रोज जरी झाले मतभेद, होणार न कधीच द्वंद
जिव्हाळ्याचा अन् अतुट असतो हा मर्मबंध**

**लाखोच्या गर्दीत ही ठळक दिसतील असे मोजकेच असतात मीत्र
शाळकरी आयुष्यात जुडलेले, मरणोत्तर ही विलग न होणार हे सूत्र**

**संकट काळात खांद्यावर हात ठेउन म्हणेल जो घाबरू नकोस भावा
असा सर्वांच्या आयुष्यात एक तरी जिवलग हवा**

**सगळ्या नात्यात असत मैत्रीच नात श्रेष्ट,
टिकविण्या साठी मात्र उपजावे लागतात अमाप भावनिक कष्ट**

**शिळी भाकरी-चटणी वाटून खाण्यात मैत्रीतला वेगळाच आनंद
हळूहळू मनामनात रूजत जाते पुढे हा विशीष्ट सुगंध**

**निखळ निस्वार्थ जिवाला जीव देणार रक्ताच नसलेल एकमेव नात
मना मनाच्या शेतीत भावनांनी कसलेल, डवरलेल हे हीरवगार पात**

**कितीही आली वादळ तरी पाठीशी खंबीर उभ राहत
दलदलीत फसलेल्या सवंगड्यालाअलगद खेचून बाहेर काढत**

**चला मित्रांनो आज मैत्र दिना निमीत्त घेऊया एक शपथ
एकमेका प्रतीच्या अंतरीक ओढीने ठेउया अनमोल मैत्री आपली टिकत**

**ग्रुप मधील माझ्या सर्व जिवलग मित्रांना समर्पित माझी ह्धयस्त भावना**

**-अरूण म्हैसेकर**

## श्री संत शंकरस्वामी महाराज फिरता नारळी अखंड हरीनाम सप्ताह विशेष वर्ष-२७७

# आध्यात्मिक क्षेत्राचे केंद्रबिंदू : शिऊरचे श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर



शांताराम मगर
संपर्क क्र. 9421417540

आधुनिक केसरी

**वारकरी संप्रदायाचे प्रचार आणि प्रसाराचे कार्य करीत भक्तींचे विचार समाजातील सर्व लोकांच्या मनात रुजवत भागवत श्रवण करून मार्गशीर्ष वद्य अष्टमी शके १६६७ साली समाधी घेणारे श्री संत शंकरस्वामी महाराज यांचे पवित्र प्रणीता तीर्थाच्याच्याकडेला टोलेजंग समाधीस्थळ सध्या अध्यात्म क्षेत्राचे केंद्रबिंदु ठरत आहे. संतभूमी शिऊर येथे बांधण्यात आलेले १२८ फुटी मंदीर मराठवाड्यातील सर्वात मोठे मंदिर ठरले असुन अध्यात्मिक दृष्टीने अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. औरंगाबाद -नाशिक 752 राष्ट्रीय महामार्गावार वसलेल्या वैजापूर तालुक्यातील शिऊर हे वीस हजार लोकसंख्येचे गाव.**

ऐतिहासिक, सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा जपणारे गाव अशी या गावाची ओळख आहे. त्यासोबतच मंदीरांचे गाव म्हणुन देखील शिऊर परिचित आहे. श्री संत बहीणाबाई पाठक, श्री संत शिवाई माता यांचे समाधी स्थळांबरोबरच जगतगुरु तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य श्री संत शंकरस्वामी महाराजांची समाधी देखील शिऊर गावी असल्याने भक्तीचा त्रिवेणी संगम येथे पहायला मिळतो.

**देखणे मंदिर**

श्री संत शंकरस्वामीं शके 1667 साली समाधीस्थ झाले त्यानंतर 1849 च्या दरम्यान, त्याकाळात प्रचंड नाणे टंचाई असताना भाविकांनी हातभार लावला होता. त्यावेळी मंदिराचे वाळु व चुणा एकत्र करत त्याला दगडी चाकाने रगडवून त्या मिश्रणातून दगडाचे बांधकाम केले होते. त्यानंतर वेळोवेळी त्यात पुर्नजिर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात येवून पुर्ण करण्यात आले. 2013 साली देखील नव्याने मंदीर बांधकामाचा निर्णय घेण्यात येवून तालुक्यातील सर्वपक्षीय पुढाऱ्यांच्या योगदानातून व भावीकांच्या देणग्यांच्या माध्यमातून मंदिर जिर्णोध्दाराचे काम हाती घेण्यात आले. मंदीरामध्ये विश्वस्त मंडळाचे कार्यालय, कीर्तनकार व प्रवचनकारांची राहण्याची सोय, अध्यात्म संस्कार केंद्र आदी व्यवस्था केली गेली आहे. यासोबत मंदिर परिसरात सुशोभीकरण करण्यात येत असून भव्य कीर्तन मंडप लक्षवेधी ठरला आहे तर मंदिराच्या माध्यमातून व्यापारी संकुल देखील उभारले गेले आहे. प्राणिता तीर्थ घाटबांधकाम आता हाती घेण्यात येणार आहे.

**उत्साह, भक्ती, परंपरा याची उत्तम सांगड म्हणजे श्री संत शंकरस्वामींचा सप्ताह...**

या जगामध्ये कृपावंत व कृपापात्र या दोन्हींचा विचार करताना कृपावंत होणे हे कठीण असते. कृपावंत होण्यासाठी कृपा करण्याची क्षमता, अभिरुची, पात्र-अपात्र भेद विरून गेलेला, निरपेक्ष भाव, श्रेय अनासक्ती आदी गुणविशेषता अंगी बाणलेली असावी लागते. तेव्हाच कृपावंत अशी ख्याती होते. श्री संत शंकरस्वामी महाराज कृपावंतच होते. सर्वात श्रेष्ठ कृपावंत हे माय-बाप असतात. त्याहीपेक्षा कृपावंत हे साधुसंत असतात. कारण त्यांच्याकडे आप-पर भाव नसतो. संत कृपेचे फळ हे सर्वोच्च पातळीवर मानवी जीवनाचे कल्याण करणारे असते. प्रसंगी शत्रूभाव घेऊन आलेल्या व्यक्तीशी ही संत कृपावंतच होतात. त्यामुळे ज्यांच्या भाग्यात असे कृपावंत लाभतात त्यांचे जीवन कृतार्थ होते असे सांगत भगवंतांची करुणा सागरा सारखी विशाल असून दुःखाचा संसार सुखाचा करण्यासाठी भगवंत चरणी विलिन होणे गरजेचे आहे. श्री संत शंकरस्वामींचा आधिकार राज्यात मोठा असून स्वामींनी समाजाच्या उद्धाराकडे लक्ष दिले. सप्ताहाच्या माध्यमातून अन्नदान व ज्ञानदानाचा महाजागर करण्यात आला असून मन व बुद्धीचे शुद्धीकरण परमार्थमध्ये होते. वारकरी सांप्रदाय हा सगुण निर्गुणच्या पुढे असून संताच्या विचारात जगणे म्हणजेच सत्संग आहे. श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या समाधी मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्णझाले असून शिऊरच्या वैभवात भर घालणारे हे भव्य मंदिर अध्यात्मिक क्षेत्राचे केंद्रबिंदू ठरले आहे.




संत तुकोबारायानंतर अध्यात्मिक मार्ग दाखविणारे शंकरस्वामी महाराज यांचे कार्य अलौकिक असून श्री संत शंकरस्वामींचे व्यासपीठ हे राज्यातील सर्वात मोठे व महत्वाचे व्यासपीठ आहे. शांती, भक्ती व श्रीमंतीचा संगम म्हणजे श्री संत शंकरस्वामी महाराज आहे. अखंड हरीनाम सप्ताह म्हणजे वारकऱ्यांचा महाउत्सव असून संत विचारांची प्रेरणा देण्यासाठी हरीनाम सप्ताह गरजेचा आहे. संसारिक ठेवा हे संपणारे धन आहे मात्र पारमार्थिक धन चिरकाल टिकणारे असून पारमार्थिक धनाने पिढी संस्कारित केली जाते, भाववृत्तीने केलेला परमार्थ हा सफल ठरतो. भक्तीभाव तिथे देव असून परमार्थाने मन, बुद्धी अंतकरण शुद्ध होते. सर्व श्रीमंतीपेक्षा अध्यात्मिक श्रीमंती सर्वात मोठी असून अध्यात्मिक श्रीमंती टिकाऊ असते, सज्जनपणाच्या भावनेचा अधिक विकास होतो तेव्हा संतत्व प्राप्त होते, संसारातून परमार्थकडे प्रवास हे संतांचे वैशिष्ट्य असून आत्मकल्याण साधून मनोबल वाढविण्यासाठी परमार्थकरणे आवश्यक असून संताचे समाजासाठी बहुमोल योगदान असून विवादाकडून संवादाकडे हीच संताची शिकवण आहे. स्वामींच्या सप्ताहाची अध्यात्मिक अखंडीत सेवा असून यातून ज्ञानदान व अन्नदान घडत आहे. या परंपरेचा अभिमान आहे.

**श्री संत शंकरस्वामी महाराज जीवन-कार्य**

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणून ओळखली जाते या राज्यात अनेक संत होऊन गेले. जगतगुरु तुकाराम महाराजांचे शिष्य संत निळोबाराय आणि निळोबारायांचे शिष्य शिऊरचे श्री.संत शंकरस्वामी महाराज. औरंगाबाद - नाशिक महामार्गावर वसलेल्या श्री क्षेत्र शिऊर या गावात प्रणिता तीर्थाच्या कडेला श्री संत शंकरस्वामी महाराज व त्यांचे सुपुत्र नारायणस्वामी महाराजयांचे भव्य दिव्य समाधी मंदिर आहे. दररोज या ठिकाणी भक्तांची वर्दळ असते. स्वामींच्या आईचे नाव आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव रेणुकादास असे होते. स्वामींच्या घरात सराफाचे दुकान होते कालांतराने वारसा हक्काने ते दुकान स्वामींकडे आले. शंकरस्वामींचे मूळ आडनाव देशपांडे असे होते. त्यांच्या हातून लाखो रुपयांचा व्यवहार होत असल्यामुळे त्यांचे आडनाव लाखे असे पडले. त्यांना बालपणापासूनच नामस्मरणाची व भगवंत कार्याची आवड होती. पांडुरंगावर त्यांची अमाप श्रद्धा होती. लोक जागृतीसाठी शिऊरक्षेत्री जावे असे पांडूरंगानी दृष्टतात सांगितल्यामुळे आपल्याकडील सर्वसंपत्ती दान करून संत शंकरस्वामी शिऊर येथे आले. स्वामींचे वास्तव्य सुरु झाल्यामुळे खऱ्या अर्थाने वारकरी संप्रदायाचा महान आचारांचा व विचारांचा परिसरात प्रचार होऊ लागला. श्री संत शंकरस्वामी महाराज व श्री गुरुदेव दत्त महाराजांची भेट शिऊर येथे एका वटवृक्षाखाली झाली. भागवत कार्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी आपण निळोबारायाकडून विणा घ्यावा असे सुचविले. दत्त महाराजांच्या सुचनेप्रमाणे स्वामी शिऊर जवळच असलेल्या भिक्षुकवाडी (टूणकी) येथे आले. वया भिक्षुकवाडीत संत तुकाराम महाराज यांची निळोबा महाराज व शंकरस्वामी महाराज यांची भेट झाली. भागवत धर्माचे सूत्र शंकरस्वामींनी स्वीकारले. आजही जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या पादुका या वाडीत आहेत. माऊली ज्ञानेश्वर महाराज यांनी रेड्यामुखी वेद वदविले त्याचप्रमाणे शंकरस्वामींनी सर्पास बोलायला लावल्याची आख्यायिका आहे. श्री संत शंकरस्वामी महाराज हे आषाढी व कार्तिकी वारीस भाविकांना बरोबर घेऊन पंढरपुरास जात असत ते खाजगीवाले यांच्या वाड्यात थांबत होते तेथे धर्मसिंधू ग्रंथकार बाबा पाध्ये यांच्या मुखातून शिऊर येथे श्रीमदभागवत कथा ऐकण्याची इच्छा श्रीविठ्ठल रुख्मिणी मंदिरात बाबा पाध्ये यांनी स्वामीना श्रीमद भागवत कथा सांगण्यास सुरुवात केली. दरम्यान काही साधू जांच्याजवळ हनुमंताची मूर्ती होती ते याकार्यक्रमात सहभागी झाले. मार्गशीर्षवद्य सप्तमीस ग्रंथाची सांगता झाली तेव्हा साधूंनी स्वामींचा निरोप घेऊन मारोतीची मूर्ती उचलण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्याकडून ती झोळी उचलली गेली नाही त्यांनी स्वामीकडे पहिले. स्वामींनी सांगितले, मारोतीला इथेच सेवा करावयास थांबावयाचे आहे साधू आज्ञा घेऊन निघून गेले मात्र मारोती स्वामींचे देवघर असलेल्या श्रीविठ्ठल रुख्मिणी मंदिरात थांबले ते आजही आहेत. मलप्पा वासकर यांनी रचलेल्या स्वामीच्या आरतीत "समभाव तुमची थोरवी, आला मारोती सेवेला" असे प्रमाण दिले आहे.

वारकरी संप्रदायाचे कार्यकरीत महान भक्तींचे विचार समाजातील सर्व लोकांच्या मनात रुजविले. त्या प्रसंगी भागवत श्रावण करून मार्गशीर्षवद्य अष्टमी शके १६६७ साली समाधी घेतली. ज्या पवित्र तीर्थाच्या कडेला स्वामींनी आपल्या समाधी घेतली. त्या तीर्थाचे नाव प्रणितातीर्थ होय. संत शंकरस्वामी महाराज व पुत्र नारायणस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमिताने शिऊर गावात यात्रा भरवली जाते. आठ दिवस चालणाऱ्या या यात्रा उत्सवात अखंड नामस्मरण करण्यात येते. तर श्रावण महिन्यात अखंड हरीनाम फिरता नारळी सप्ताह संपन्न होतो.



# नॅन्सी पेलोसीच्या तैवान दौऱ्याने चीन आगबबुला



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**चीनने नॅन्सी पेलोसीच्या दौऱ्याचा जोरदार विरोध केला.पेलोसीने तैवान दौरा करू नये याबद्दल चीनने अमेरिकेला वारंवार ताकीद दिली तरीही चीनने दिलेला इशारा धुडकावून अमेरिकी प्रतिनिधीगृहाच्या सभापती नॅन्सी पेलोसी मंगळवार दिनांक 2 जुलै 2022ला तैवानमध्ये दाखल झाल्या. सार्वभौमत्वाच्या मुद्द्यावरून चीनने पेलोसी यांच्या तैवान दौऱ्याचा विरोध केला होता. याची जबर किंमत अमेरिकेला चुकवावी लागेल असे चीनने धमकावले सुध्दा होते. या चीनच्या धमकीला न जुमानता पेलोसी मलेशियातून तैवानला पोहोचल्या व तैवानच्या अध्यक्षा त्साई इंग वेन यांच्याशी व्दीपक्षीय चर्चा करून अमेरिका सदैव तैवानच्या पाठीशी आहे याची ग्वाही दिली.**

यामुळे तैवान-चीनमध्ये युद्धजन्य परिस्थितीत निर्माण झाली आहे.एकीकडे गेल्या 5 महिन्यांपासून रशिया -युक्रेन युध्द सुरू आहे. याच धरतीवर चीन तैवानला घेण्याच्या तयारीत आहे आणि तशी तयारी सुध्दा केली आहे. रशिया-युक्रेन युध्द वेगळे आहे यात अमेरिकेचा व ब्रिटनचा प्रत्यक्ष हस्तक्षेप नाही. परंतु तैवान सोबत चीन युध्द झाले तर अमेरिका पुर्णपणे तैवानला मदत करेल त्यापध्दतीने अमेरिकेने सुध्दा आपली जय्यत तयारी केली आहे. त्यामुळे आता नॅन्सी पेलोसीच्या दौऱ्यामुळे चीन -तैवान युध्दाची ठीणगी उडते की काय असे जगाला वाटत आहे. ही ठीणगी फक्त तैवान पुरती सीमीत रहाणार नसुन महायुध्दाच्या दिशेने अवश्य जाऊ शकते याला नाकारता येत नाही.

अमेरिकी प्रतिनिधीगृहाच्या सभापती नॅन्सी पेलोसी तैनातमधुन बाहेर पडताच चीनच्या 27 विमानांनी बुधवारी तैवानच्या हद्दीत घुसखोरी केली. यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव शिगेला पोहोचला आहे. यामुळे चीन, रशिया सारखी युद्ध निती तैवान विरूद्ध वापरू शकते. कारण पेलोसीचा तैवान दौऱ्याने चीन आगबबुला झाला आहे. त्यामुळे तो तैवान विरूद्ध केव्हाही सैन्य कारवाई करू शकतो. कारण चीनने पुर्वीच तैवानच्या सिमावर्ती भागात अत्याधुनिक सैन्य सामुग्री, क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने व दारूगोळ्याचा जखीडा तैनात केलेला आहे आणि आता पेलोसीच्या दौऱ्याने चीन-तैवानच्या आगीत अमेरिकेने तेल टाकण्याचे काम केल्याने चीन-तैवान संघर्ष महायुध्दाच्या दिशेने जातांना दिसत आहे. पेलोसीचा तैवान दौरा म्हणजे अमेरिकेची मोठी चूक आहे याची किंमत अमेरिकेला मोजावी लागेल असा इशारा चीनने अमेरिकेला दिला. म्हणजे आता चीन-तैवानचा संघर्ष रहाला नसुन सरळ चीन -अमेरिका संघर्ष होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पेलोसीच्या दौऱ्यानंतर चीनने तैवानच्या 100 हुन अधिक अन्न उत्पादनाच्या आयातीवर आणि वाळू निर्यातीवर प्रतीबंध लावले आहे. म्हणजे चीन तैवानला युध्दाच्या दृष्टीकोनातून घेरत आहेच परंतु आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या दृष्टीने सुध्दा कामाला लागलेला आहे.



कारण चीन तैवानला आपला हिस्सा मानतो. त्यामुळे तो अमेरिकेचा हस्तक्षेप कदापि सहन करायला तयार नाही. त्यामुळे तैवानच्या वादातुन चीन -अमेरिका संघर्ष पेटु शकतो व यांचा परिणाम महायूध्दात परीवर्तीत सुध्दा होवू शकतो. कारण चीनने पेलोसीच्या तैवान दौऱ्याच्या बाबतीत अमेरिकेला वारंवार चेतावणी दिली की पेलोसीने तैवान दौरा केला तर याचा परिणाम भयानक होईल. तरीही नॅन्सी पेलोसी यांनी चीनच्या धमकीला न जुमानता तैवान दौरा केला. त्यामुळे चीनच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे. त्यामुळे तो तैवानवर केव्हाही कधीही मोठी कारवाई करू शकतो. चीन-तैवान युद्ध झालेच तर हे युद्ध युक्रेन -रशिया युध्दापेक्षा महाभयानक होईल व यांचा परिणाम सीमावर्ती भागासह संपूर्ण जगाला भोगावा लागेल. पेलोसीच्या दौऱ्याच्या अनुषंगाने चीनने तैवानच्या आसपास नौसेना आणि वायुसेना यांनी तैवान सीमावर्ती भागात संयुक्त अभ्यास सुरू केला आहे. यात मिसाईल परिक्षणाचा दावा सुध्दा करण्यात आला आहे.चीन तैवानवर सायबर हमले सुध्दा करीत आहे.तैवान जगात इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या बाबतीत अग्रेसर आहे त्यामुळे चीनसह अनेक देश तैवानवर अवलंबून आहे. त्यामुळे तैवान आपल्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पुर्णपणे तयारीत आहे. पेलोसी चीनला आपला कट्टर दुश्मन समजते. कारण नॅन्सी पेलोसी या दीर्घकाळापासून चीनच्या टीकाकार राहल्या आहेत. 1991 च्या बीजिंगच्या भेटीदरम्यान, पेलोसी यांनी तियानमेन स्क्वेअरवर जात एक बॅनर फडकवला. यावर लिहिले होते, चीनमध्ये लोकशाही मरण्यासाठी. तियानमेन स्क्वेअर हे तेच ठिकाण आहे जिथे 1989 लोकशाहीच्या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करीत होते आणि त्यावेळी लष्कराने त्यांच्यावर गोळीबार केला होता व यामध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला. त्यामुळे पेलोसी चीनला लोकशाहीचा हत्यारा समजते. म्हणुनच पेलोसीने मुद्दाम तैवान दौरा करून चीनच्या जखमेवर मीठ चोळले व शि. जिनपिंग आगबबुला झाला. तैवान चीन संघर्ष वाढत आहे. या पार्श्वभुमीवर चीनने तैवानजवळील समुद्रात लष्करी सराव करीत आहे. जगभरातील निम्म्याहून मालवाहू जहाजे याच मार्गावरून जातात. तैवान मार्फत सेमी कंडक्टर व अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जगभर पाठवीली जातात. नैसर्गिक वायू पुरवठ्यासाठीही हा सागरी मार्ग महत्वपूर्ण आहे. परंतु चीनच्या लष्करी सरावामुळे सागरी वाहतूक बाधीत होण्याची शक्यता आहे. रशिया-युक्रेन युद्ध जरी या दोन देशांमध्ये सुरू आहे तरी यांचे प्रायचित्य आताही संपूर्ण जग भोगत आहे. याच पध्दतीने जर तैवान-चीन संघर्ष विकोपाला गेला तर याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. त्यामुळे चीन-तैवान संघर्ष टाळण्यासाठी जगाने युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.

# आदिवासी समाज मूलभूत सुविधांपासून कोसोदूर

शंकर बरडे
संपर्क क्र. 9

आधुनिक केसरी

**बहुतांश आदिवासी समाज आर्थिक, शैक्षणिक व मुलभूत सुविधांपासून कसो दूर आहे.. उच्चं शिक्षित मुलं चांगला रोजगार मिळावा म्हणून धडपडत आहे. त्यांना आज हि साथ मिळत नाही सरकारी यंत्रणेची... आजच्या जागतिक आदिवासी दिनानिमित्त घेतलेला आढावा... आदिवासी समाज म्हटलं तर अतिशय दुर्गम, डोंगराच्या पायथ्याशी निसर्गाच्या सानिद्यात वसलेला समाज, असल्याने या ठिकाणी पुरेशा शैक्षणिक सुविधा मिळत नाहीत. विशेषतः आदिवासी विकास विभागाची शैक्षणिक गंगा तळागाळापर्यंत पोहचली असे म्हणता येत नाही.**

राज्यात आदिवासी विभागाच्या ५०० च्या वर आश्रमशाळा आहेत. परंतु, त्या ठिकाणी विद्यार्थी केवळ पोटार्थी म्हणून येतो. घरी उपाशी राहतो म्हणून निदान आश्रमशाळेत पोटभर अन्न मिळेल या आशेने विद्यार्थी शाळेत येतात. परंतु आश्रमशाळांत विद्यार्थ्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळत नाहीत. त्यामुळे जेमतेम दहावीपर्यंत मुली शिक्षण घेतात. कारण, पालक मुलींना भीतीपोटी घरी घेऊन जातात. दुर्गम भागात शाळा असल्याने शिक्षक अधिकारी वर्गाशी साटेलोटे करून फक्त पगार घेतो. काही अपवाद वगळता मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. मुले दगावतात परंतु कुणाही प्रशासकीय अधिकारी वर्गाला आदिवासींच्या या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी कणव येत नाही.



आज शासनाच्या, वनजमिनींचेदेखील आदिवासींना, भूमीहिनांना वाटप होणे गरजेचे आहे. मुद्दाम वेळ काढूपणा करणे, फाईल गहाळ करणे, उडवाउडवीची उत्तरे देणे, अशी उपद्रवात्मक कामे वन्य विभागाचे व आदिवासी विभागाचे अधिकारी करतात. त्यामुळे आदिवासींची तुटपुंजी शेती आणि तिचा म्हणावा तसा विकास होत नाही. तो आर्थिक हालाखीत व दारिद्र्यात जगतो. आदिवासी शेतकऱ्यांची पिके अगदी नगण्य भावाने आदिवासी महामंडळ खदेरी गरते. खावटी कर्जे अतिशय अल्प देते. डोंगराळ भागात पाणी साठवण-सिंचनाच्या सोयी नसतात. योजना या राबविल्या जात नाहीत. त्यामुळे आलेला निधी परत जातो, नाहीतर पळविला जातो. आदिवासी समाजाला चार महिने काम नसते. पावसाळी कामे आणि पीक कापणी संपल्यावर लोक शहराकडे स्थलांतर करतात. शहराच्या मोकळ्या जागेत बिऱ्हाड टाकून राहतात. दोनशे ते तीनशे रूपये रोजंदारीवर पडेल ते काम करतात. परंतु जेमतेम शिक्षण घेतलेला युवावर्गदेखील मजुरीच्या शोधात शहरात येतात. त्यांच्या पाड्यावर कोणताच रोजगार नसतो. आदिवासी समाजाच्या नावाखाली आजही अनेक लोक खोट्या जातप्रमाणपत्रावर नोकरी करीत आहेत. मूळ खरा आदिवासी विकासापासून दूर राहिला आहे. आज देशात १६० च्यावर आदिवासी समाजाचे लोकप्रतिनिधी आहेत. परंतु ते विविध राजकीय पक्षांच्या दावणीला बांधलेले आहेत. त्यांना आदिवासी बांधवासाठी काही करण्याची इच्छा असते, परंतु पक्षप्रमुखांच्या मर्जीपुढे जाता येत नाही. सांस्कृतिक पातळीवर समाजाला उच्च जीवनमूल्य आहेत. आदिवासी समाजाच्या विविध बोली, भाषा, परंपरा, चालीरीती आजही टिकून आहेत.

त्याठिकाणी वैचारिक व सांस्कृतिक देवाणघेवाण झाली पाहिजे. कारण अशा सांस्कृतिक चळवळीतून मानवी जीवनाच्या समस्या व त्यावर उपाय यावर चर्चा होते व योजना आखल्या जातात. आज आदिवासी समाजात उच्च शिक्षण घेणारा वर्ग पुढे येवू पाहत आहे, मात्र त्यातील बरेचजण बेकार आहे. शासन आणि आदिवासी राज्यकर्त्यांकडे याविषयी डाटा नाही. बेकारीची कुऱ्हाड या उच्च शिक्षितांवर कोसळली नव्हे ती घाव घालून दारिद्र्याकडे नेत आहे. आदिवासी राज्यकर्त्यांनी आपल्या बांधवांचे दुःख पाहण्याचे धारिष्ठ्य दाखवावे. नाशिक, नांदेडच्या आदिवासी साहित्य संमेलनात आदिवासी विद्यापीठाची स्थापना झाली पाहिजे, असा ठराव मंजूर करण्यात आला. ते झाले पाहिजे. जोपर्यंत आदिवासी राज्यकर्ते याबाबत आवाज उठवत नाही तोपर्यंत सरकार तुमच्या पदरात काहीच टाकणार नाही. आज आदिवासी बहुल क्षेत्रात बिगर आदिवासी अधिकारी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक, महसूल, वनविभाग सिंचन योजना, रोजगार हमी योजना या ठिकाणी कार्यरत आहेत. एखादा तळमळीचा एखादाच अधिकारी प्रामाणिकपणे आदिवासी क्षेत्रात काम करतो. परंतु तेवढ्याने म्हणाव्या तशा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा होत नाहीत. राज्यपाल महोदयांनी आदिवासी क्षेत्रात केवळ आदिवासींची भरती करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने माननीय राज्यपालांनी नोकरभरतीचे आदेश देखील काढले आहेत. परंतु नोकरभरती राबविणारी यंत्रणा तेवढीच पारदर्शक असली पाहिजे. अन्यथा नोकरभरतीचे कुरण होते.

आदिवासींचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाच्या मूलभूत सोयी सुधारल्या पाहिजेत. मुलांचे आरोग्य, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुलींची सुरक्षितता, मुलींचे होणारे लैंगिक शोषण थांबले पाहिजे. पेसा कायद्यांतर्गत शासनाच्या प्रत्येक खात्यात केवळ आदिवासी शिक्षितांची नोकर भरती झाली पाहिजे. दुर्गम भागात दळणवळणाची साधणे आणि पक्के रस्ते बांधले पाहिजेत.

पाझर तलाव, शेततळी, लघुपाटबंधारे बांधून पिण्याचा आणि शेती सिंचनाचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. वाड्या -पाड्यावर, हाकेच्या अंतरावर किमान प्राथमिक दवाखाना झाला पाहिजे. शेती विकासाच्या योजना राबवल्या पाहिजे. उच्चशिक्षितांना बेकारभत्ता दिली पाहिजे. पीएच.डी., एम.फिल व अन्य तांत्रिक संशोधनाला कोणतीच शिष्यवृत्ती आदिवासी विभाग देत नाही. ती चालू करण्यात यावी. पेसा कायदा व ॲट्रासिटीचा कायदा राबविला पाहिजे. खोटी जातप्रमाणपत्रे जप्त करून संबंधितांवर दंडात्मक कारावासाची कार्यवाही झाली पाहिजे. नोकरदारांनी पोटभरू न होता समाजाच्या प्रश्नवर काम करावे. एकत्र यावे. आदिवासी लोकप्रतिनिधींनी अत्यंत जागृत राहून समाजाच्या प्रति असलेली नाळ जोडून ठेवावी. कारण, केवळ आदिवासी समाजामुळे आपल्याला राजकीय सत्तेची फळे चाखायला मिळाली आहेत याचे भान आणि जाणीव त्यांनी ठेवावी.

# ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार : श्री क्षेत्र राक्षसभुवन

उदय पाठक
संपर्क क्र. 9422041907

आधुनिक केसरी

**राक्षसभुवन हे गेवराई तालुक्यातील धार्मिक, पौराणिक आणि ऐतिहासिक महत्त्व असनारे पुरातन असे गाव आहे. भारतातील रविपुत्र शनिमहाराजांच्या साडेतीन पिठापैकी एक पिठ या ठिकाणी आहे. नवग्रह मंदिर, आष्ट तीर्थ असनारे एकमेक ठिकाण म्हणजे श्री. क्षेत्र राक्षसभुवन. याचबरोबर या गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी देखील आहे.**




इ.स. 1763 मध्ये थोरले माधवराव पेशवे पेशवाईचा कारभार पाहात होते तेंव्हा त्यांनी निजामाला हुलकावणी देत त्यांचा प्रदेश काबीज करत असताना पेशवे परत पुण्यात यावेत म्हणून निजामाने विठ्ठल सुंदर सह पुणे लुटले. मंदिरांचे व पुण्याचे आतोनात नुकसान झाले. पण पेशवे आपल्या डावाला फशी पडत नाहीत असे पाहून त्यांनी औरंगाबाद जवळ करण्याचे ठरवले. कारण पावसाळा सुरू झाला होता. मोहिमेवर असणाऱ्या माधवरावांना हि खबर मिळाली. लागोलाग सोबत असणाऱ्या राघोबादादा व मल्हारराव होळकर यांच्याशी चर्चा करुन मध्येच कोठेतरी निजामाला खिंडीत पकडून नामोहरम करण्याची योजना माधवरावांनी आखली. पेशव्यांची छावणी मोहिला होती. तेथे पेशव्यांना निजामाची इत्थंभूत माहिती मिळाली.

औरंगाबाद गाठण्यासाठी निजाम गोदावरी पार करण्याच्या बेतात आहे त्यासाठी गोदावरीला आलेल्या भयंकर पुराची तमा न करता निजाम गोदावरी ओलांडून जाण्याची धडपड करत होता. राक्षसभुवन मधुन लहान मोठ्या होड्या मिळवुन निजाम पैलतीर गाठत होता. विठ्ठल सुंदर आलीकडे होता आठ-दहा हजार फौज मागे होती. लवाजमा व तोफा घेऊन निजाम पैलतीरी गेला होता. निजामाची सारी मदार ज्या विठ्ठल सुंदरवर होती तो गाठण्याचा मोका होता. हे जाणुन पेशव्यांनी आषाढ वद्य अमावस्येस रात्रीच मोहिहुन कुच केली. अंधारातुन राक्षसभुवन जवळ करीत दुसऱ्या दिवशी सकाळी 10 ऑगस्ट 1763 रोजी राघोबादादा, मल्हारराव होळकर, आबा पुरंदरे, विठ्ठल शिवदेव यांनी विठ्ठल सुंदरच्या तोफांची पर्वा न करता हल्ला चढवला. निकराच्या घनघोर लढाईने राक्षसभुवनचा परिसर दणाणुन गेला.

आख्खे राक्षसभुवन गाव या लढाईने जवळ जवळ नष्ट झाले. विठ्ठल सुंदर निकराने व हिराररीने या हल्ल्याला तोंड देत होता. मल्हारबांना तर पराजय होण्याची चिन्हे दिसू लागली. निजाम पैलतीरावरुन सैन्य व तोफखाण्यासह हे सर्व पाहात होता. परंतु मध्ये गोदामाई महापुराचे रौद्ररूप धारण करून वाहात होती म्हणून इच्छा असुनही तो विठ्ठल सुंदरच्या मदतीला जाऊ शकत नव्हता. मल्हाबांनी व माधवरावांनी पराक्रमाची शर्थ करत राघोबादादांना पडलेला वेढा दुर केला. मोगलांच्या सात आंबाऱ्यापैकी मधल्या अंबारीत विठ्ठल सुंदर बसला होता. महादजी शितोळे यांनी स्वतःच्या भाल्याने विठ्ठल सुंदर यांना अचूक टिपले. विठ्ठल सुंदर कोसळले तसा मोगलाच्या सैन्यात हाहाकार उडाला. लांडगे तोड सुरु झाली. गोदावरीच्या पुराची तमा न बाळगता काहींनी पाण्यात उड्या घेऊन जीव वाचवला.

दुसऱ्या दिवशी पैलतीरावर निजामास गाठुन त्यांचा पाडाव करण्याचा माधवरावांचा विचार होता. परंतु रात्रीतुनच तोफा तेथेच टाकुण निजाम पैलतीरावरुन पसार झाला. मराठ्यांच्या विजय झाला. मृत्युनंतर शत्रुत्व संपते या न्यायाने माधवरावांनी गोदातीरी विठ्ठल सुंदरची क्रिया करुन समाधी बांधली. माहादजी सितोळेंना मांजरी गावचे इनाम सरदारकी बहाल करण्यात आली. या सर्व पराक्रमाचे साक्षीदार होण्याचा मान राक्षसभुवनला असल्याने या गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

DC
शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) पाने ५३४ ~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त पाने ५३४ ~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज पाने ३६४ ~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकिजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# सावळदबारा येथे लाखो रुपये खर्चून बांधलेले सेवा सोसायटीची इमारत धूळ खात पडून

## परिसरातील लोकप्रतिनिधी, चेअरमन व सभासदाचे झाले दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सावळदबारा :** येथील वि.वि.कार्यकारी सेवा सोसायटीची इमारत सध्या धुळखात पडून आहे. शासनाने ७० ते ६० वर्षापूर्वी बांधलेल्या वि.वि सेवा सोसायटीला लाखो रुपये खर्चून बांधण्यात आले होते. परंतु ते आज दहा ते बारा वर्षांपासून वादळी वाऱ्यापासून तिच्यावरचे असलेले टिन पत्रे व लोखंडी ऐंगल उडून गेले आहेत ते टिनपत्रे उडून गेल्यापासून अद्यापही विविध विकास सेवा सोसायटीच्या त्या इमारतीवर बसलेच नाही. चेअरमन, व्हाइस चेअरमन व कार्यकारी मंडळ यांनी या इमारतीकडे साधे फिरुकून सुद्धा पाहिलेले दिसत नाही. सावळदबारा या गावाला अठरा गावाचा समावेश येत असून नेहमी परिसरातील नागरिकांची येथे सोसायटी परिसरात नेहमीच वर्दळ असते. शेतकऱ्यांना बसण्यासाठी बसस्थानक नाही परिसरात फक्त रणभण फिरावे लागते. परंतु येथे या असुविधेकडे येथील पांढरपेशी नेतेमंडळी साधे ढुंकून सुद्धा बघत नाही. या वि.वि.सेवा कार्यकारी सोसायटीच्या बांधून दहा ते बारा वर्षे लोटली तरी कोणी फिरकून पाहत नाही.
या इमारती जवळ पुर्णपणे पालापाचोळा तसेच पावसाचे पाणी आतमध्ये साचले असून जागोजागी जंगली मोठमोठी गवते उगली असुन सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथील स्थानिक बेरोजगार तरुण व काही व्यवसायिक, शेतकरी हे असे म्हणतात की, ही वि.वि.सेवा सोसायटीची इमारत चालू करा जुन्या काळातील गावठाण जमीनीवर हे गोडाऊन बांधण्यात आले होते. परंतु ते धुळखात पडून असून येथे ग्रामस्थ, कर्मचारी, बसस्थानक वरचे प्रवाशी लघुशंका करून जातात. एकेकाळी वि.वि. सेवा सोसायटीमध्ये खत विक्री संघाचे दुकान चालत होते. त्यांचे भाडे सोसायटीला मिळत असे पण आज वि.वि. सेवा सोसायटीच्या गोडाऊनचे तीनतेरा वाजून ही इमारत धुळखात पडली आहे याला जबाबदार फक्त इथले पांढरपेशी लबाड लोकप्रतिनिधी असून ते फक्त आपल्या पात्रावर कसा घास येईल हेच पाहत असतात. त्यामुळे गावातील विविध विकास कामाकडे यांचे पुर्णतः दुर्लक्ष असून त्यांच्यामुळे ह्या सोसायटीच्या बांधलेल्या इमारतीचे तीन तेरा वाजले आहे. सदर इमारतीचे बांधकाम हे एक ते दिड गुंठा जाग्यामध्ये डबरमध्ये बांधकाम करण्यात आले होते. त्या इमारतीसाठी आणलेले लोखंडी ॲंगल, पाईप, टिनपत्रे कोठे पडून आहेत? का चोरी गेले आहे. हे कोणी आज सांगू शकत नाही, अशा प्रश्न सामान्य शेतकऱ्यांना व सभासदांना पडला आहे. या दुर्लक्षित झालेल्या इमारतीचे येथील लोकप्रतिनिधी वापर करतील का असा प्रश्न सुद्धा सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.





# धुळ्यात कानबाई विसर्जन जल्लोषात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** उत्तर महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवी कानुमाता दरवर्षीप्रमाणे एक दिवसासाठी विराजमान होत असते. यावर्षीही थाटामाटात धुळे जिल्ह्यात खान्देश कुलस्वामिनी कानुबाई मातेची विधिवत पुजा करून स्थापना करण्यात आली.
या उत्सवासाठी बाहेरगावी गेलेले नातलग गावी आले आहेत. भाविकांनी कानुमातेचे दर्शन घेतले. रात्रभर जागरण करण्यात आले. कानुमातेची गित म्हणण्यात आली. तर लगेच दुसऱ्या दिवशी ढोलताश्यांच्या गजरात कानुमातेला डोक्यावर घेवून मिरवणूकांना सुरूवात झाली. त्यात महिलांनी फुगड्या खेळल्या. तर कानुमातेच्या गितांवर सर्वांनीच ठेकाही धरला. यंदा पांझरा नदी दुथडी भरून वाहत असल्यामुळे भाविकांनी पांझर नदीत कानुमातेचे विसर्जन करीत भावपुर्ण निरोप दिला. सायंकाळपर्यंत विसर्जन मिरवणूका सुरू राहतात. त्यामुळे शहरात सर्वत्र भक्तीमय आणि उत्साहाचे वातावरण झाले.

# भोकर पालिकेतील वाचनालय कागदावर

## वाचन संस्कृतीचे तीनतेरा; अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील वाचकांची भुक भागविण्यासाठी पालिकेनी लाखो रूपयांचे ग्रंथ, विविध विषयांवरील पुस्तके आदींची खरेदी करून वाचनालय सुरू केले आहे. मागील अनेक वर्षांपासून येथील वाचनालय बंद अवस्थेत आहे. वाचनालयावर लाखो रूपयांची उधळपट्टी करण्यात आली आहे. याबाबत पालिकेचे अधिकारी मात्र बेफीकीर असल्याने वाचन संस्कृतीचे तीन तेरा झाल्याचे समजते.
विविध विषयांवरील पुस्तके वाचली तर माणसाच्या ज्ञानात अधिकार पडते. समाजात वाचन संस्कृती रूजावी म्हणून शासनाने "गाव तिथे वाचनलय" ही योजना सुरू केली आहे. आज शहरी व ग्रामीण भागात बहुतेक ठिकाणी वाचनालय उभारण्यात आली आहेत. यासाठी लागणारा निधी सुध्दा देण्याची व्यवस्था केली आहे. बहुतांशी वाचनालय केवळ अनुदानापुरते उरल्याचे दिसून येत आहे. शासनाने प्रत्येक नगर पालिकेत वाचनालयाची सुविधा केली आहे. याच धर्तीवर येथील नगर पालिकेत वाचनालय सुरू करण्यात आले. प्रारंभी वाचनालयात फारसे ग्रंथ, वाचनीय पुस्तके नसल्याने गैरसोय झाली. दरम्यान पालिकेनी वाचकांची भूक भागविण्यासाठी लाखो रूपयांची ग्रंथसंपदा विकत आणली. तेंव्हापासून ते आजपर्यंत सदरील ग्रंथालय वाचकांसाठी खुले करण्यात आले नाही. कागदोपत्री मात्र हे वाचनालय सुरू ठेवून निधी लाटण्याचा प्रयत्न केला जातो आहे. संबंधित पालिकेचे अधिकारी मात्र वाचनालय बासनात गुंडाळून ठेवल्याने वाचकांची हिरमोड होत आहे.

**वाचकांची गैरसोय**

येथील नगर पालिकेची भव्य वास्तू नव्याने उभारली जात असल्याने तात्पुरत्या स्वरूपात एका इमारतीत पालिकेचे कागकाज सुरू आहे. पण या इमारतीत "वाचनालय"च नाही. शासनाने ज्या उद्देशाने ही योजना सुरू केली त्याची अंमलबजावणी होत नसल्याने वाचकांची हेळसांड होत आहे. संबंधितांनी वाचकात होणारी गैरसोय लक्षात घेऊन वाचनालय खुले करून द्यावे, अशी मागणी जोर धरते आहे.

# "हर घर तिरंगा" अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे : अंशू भवते

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत पिंपळवाडी गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घरावर आपल्या भारत देशाचा राष्ट्रध्वज असलेला तिरंगा ध्वज फडकावा असे आवाहन ग्रामपंचायात ग्रामसेवक अंशू भवते यांनी केले आहे. आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे गत वर्षभरापासून शासनाच्या वतीने विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत.
भारत के आझादी का अमृत महोत्सव उपक्रमा अंतर्गत दि. १३ आगस्ट ते १५ आगस्ट दरम्यान पिंपळवाडी गावाचे ग्रामसेवक भवते. यांच्या मार्गदर्शनाखाली व पिंपळवाडी गावाचे सरपंच मंगलाताई आळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळवाडी गावात "हर घर तिरंगा"अभियान राबविण्यात येणार असून या



अभियानात देव्हारी गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावा व राष्ट्रीय भावना राष्ट्रप्रेम जोपासावे असे आवाहन ग्रामसेवक अंशू भवते यांनी केले आहे व यासाठी पिंपळवाडी ग्रामपंचायत अंतर्गत जनजागृती करण्यासाठी पिंपळवाडी बचत गटांच्या महिला, पिंपळवाडी ग्रामपंचायत चे कर्मचारी गावात प्रभात फेरी काढणार आहेत, अशी माहिती ग्रामसेवक अंशू भवते यांनी दिली. तसेच पिंपळवाडी गावात हर घर तिरंगा अभियान दि.१३ ऑगस्ट ते १५ दरम्यान राबविण्यात येणार असून नागरिकांनी तिरंगा ध्वजाची खरेदी देव्हारी ग्रामपंचायत विविध महिला बचत गटाच्या स्टॅल करून खरेदी करावे, असे आवाहन ग्रामसेवक अंशू भवते यांनी केले आहे.

# २१ ऑगस्टला औरंगाबादला ब्राह्मण वधू-वर सूचक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** समर्थ ब्राह्मण वधुवर सूचक मंडळाच्या वतीने रविवार दि.२१ ऑगस्ट २०२२ रोजी औरंगाबाद येथे ब्राह्मण वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला राज्यभरातील विवाहेच्छूक वधू वर यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. क्रांती चौक, औरंगाबाद येथील कलश मंगल कार्यालयात हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राज्य भरातून या मेळाव्याला वधू वर व पालक उपस्थित राहणार आहेत.
रविवारी सकाळी ९.३० पासून मेळावा सुरू होईल. औपचारिक कार्यक्रमात वेळ वाया न घालवता जास्तीत जास्त वेळ वधू वर व त्यांच्या पालकांना एकमेकांचा परिचय करून घेता यावा आणि विवाह जुळावेत हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे, अशी माहिती संयोजक ॲड. प्रज्ञा गिरधारी यांनी दिली.
या मेळाव्यात ब्राह्मण समाजातील प्रथम वधू वर, घटस्फोटीत, विधवा, विधूर, दिव्यांग यांची नावनोंदणी सुरू असून, परिचय करून दिला जाईल. ज्यांची मुले किंवा मुली लग्नाच्या असतील त्यांना निश्चितच या मेळाव्याचा फायदा होऊन आपला जीवनसाथी भेटेल असा पुरेपूर विश्वास संयोजकांनी व्यक्त केला. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी योगदान प्रत्येकी रु. ३००/- राहील. त्यात उमेदवार व अजून एका पालकाला प्रवेश दिला जाईल. उमेदवार व सोबतच्या एका पालकाला दोन वेळा चहा आणि एक वेळ पुरी- भाजी चे जेवण दिले जाईल. जर उमेदवाराबरोबर अजून कुणी पालक असेल तर रु. १००/- वेगळे योगदान द्यावे लागेल.
नोंदणी फॉर्म आणि अधिक माहितीसाठी आयोजक ॲड. प्रज्ञा गिरधारी (मो. 78757 88529) यांच्याशी संपर्क साधता येईल. मेळावा यशस्वी करण्यासाठी वृंदा देशमुख, प्रकाश देशमुख, ॲड. अंजली तोरणेकर, स्वाती शहापूरकर, सुनील शहापूरकर, डॉ. विशाखा गोंदाणे आदी परिश्रम घेत आहेत.

# निराधार वृद्ध रुग्णांसाठी धावून आली पुसदची माणुसकीची भिंत

आधुनिक केसरी न्यूज




**पुसद :** येथील 'माणुसकीची भिंत' आपल्या सामाजिक कार्यातून नेहमीच गोरगरीब साथ, निराधारांना आधार, संकटग्रस्तांना मदत, निराश्रीतांना आश्रय, भुकेल्यांना अन्न, निर्वस्त्रांना वस्त्र देण्याचे कार्य नेहमीच करीत असल्याचे पुसद तालुक्यालालाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रांना सर्वश्रुत आहे आणि तसे अनुभव आहेत. 'माणुसकीच्या भिंती' चे कार्य सदोदीत, दररोज न चुकता अनेक वर्षापासून चालू आहे. त्यामुळे शहरातच नव्हे तर पुसद तालुक्यात असा कोणी कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी उपेक्षित दिसला की माणुसकीच्या भिंतीला स्वतः तेथे तत्परतेने व अगदी क्षणाचाही विलंब न लावता त्यासाठी धावून जाऊन मदत करते परवा उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे एक रुग्ण वयोवृद्ध असलेला उपचारासाठी दाखल झाला. त्याचे अंगावर एक फाटलेला अस्वच्छ मळकट सदरा होता. परंतु पॅंट नव्हती. उलट्यामुळे अंगा कपड्यांचा वास ही येत होता. अशा दुर्गधीमध्ये त्यांच्यावर उपचार करण्यास अडचण जात होती. याबाबतची माहिती उपजिल्हा रुग्णालयातील एका कर्तव्यदक्ष परिचारिकेने सामाजिक कार्यकर्ते मारोती भस्मे यांना दिली.
भस्मे यांनी माणुसकीच्या भिंती अध्यक्ष गजानन जाधव यांना या घटनेची माहिती देऊन रुग्णास कपडे व आवश्यक सुविधा दिल्यास त्यावर उपचार वेळेत होतील आणि त्या अनोळखी वृद्धाचा जीव वाचेल असे कळवले. त्यावेळी माणुसकी भिंतचे गजानन जाधव यांनी आपल्या टीमसह त्या वृद्ध रुग्णासाठी पॅन्ट शर्टची व्यवस्था केली. त्यांना कपडे घालून दिले. त्यांना पोटभर जेवू घातले आणि स्वच्छ झालेल्या त्या वयोवृद्ध व अनोळखी, रुग्णावर उपजिल्हा रुग्णालय उपचारास सुरुवात केली. माणुसकीच्या भिंतच्या कार्यकर्त्यांनी माणुसकी जोपासल्यामुळे आज एका अनोळखी वृद्ध रुग्णाचा जीव वाचविण्यास मदत झाली. माणुसकीच्या भिंतचे शहरात कौतुक होत आहे.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# शिऊरमध्ये अवतरली भक्ती पंढरी

## सप्ताह व एकादशीचा संगम, शिऊरला रेकॉर्डब्रेक गर्दी, सप्ताहाचा उत्सव शिगेला

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**शिऊर :** संत पंरपरेतील केंद्रस्थान असलेले श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या २७७ वा अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने शिऊरमध्ये सोमवारी अक्षरशः भक्ती पंढरी अवतरली होती. हजारो भाविकांची उपस्थिती विशेष ठरली. श्री संत तुकाराम महाराज यांच्या शिष्य परंपरेतील श्री संत शंकरस्वामी महाराज यांनी सुरू केलेला अखंड हरिनाम सप्ताह २७६ वर्षांपासून अविरत सुरू आहे. सप्ताहाचे हे २७७ वे वर्ष असून संतभूमी असा लौकिक असलेल्या शिऊर येथील श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर प्रांगणात होत आहे. २ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या या सप्ताहाला एकादशीच्या दिवशी हजारो भाविकांची मांदियाळी बघायला मिळाली. एकादशी व सप्ताह निमित्ताने संतभूमी शिऊरमध्ये जणू काही भक्ती पंढरी अवतरली होती.

**समाधीवर फुलांची आरास**

सप्ताह व एकादशीच्या निमित्ताने श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या समाधीला आकर्षक फुलांची आरास करण्यात आली आहे. सोबतच फुलांचे भव्य तोरण लक्ष वेधून घेत आहे. दरम्यान रांगोळीतुन साकारलेले विठ्ठल भाविकांचे आकर्षण ठरले.

**मोबाईलमध्ये ऐतिहासिक क्षण क्लिक**

श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान फडाचा २७७ वा फिरता नारळी सप्ताह ऐतिहासिक ठरत आहे. स्वामींच्याच समाधीस्थळी होत असलेल्या या सप्ताहाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्यानंतर हे देखणे मंदिर बघण्यासाठी व सप्ताहला हजेरी लावण्यासाठी सोमवारी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. दरम्यान हा ऐतिहासिक क्षण आपल्या डोळ्यात साठवल्यानंतर प्रत्येक जण आपल्या मोबाईलच्या कॅमेरात हे क्षणचित्र कैद करत होता.



**भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने फराळ घेत रांगेत घेतले**

**समाधीचे दर्शन**

एकादशी निमित्ताने उपस्थित हजारो भाविकांना फराळ वितरण करण्यात आले. सप्ताह समितीच्या सूक्ष्म नियोजनाने शिस्तबद्ध पध्दतीने भाविकांनी प्रसाद घेतला, तर स्वामींच्या समाधी मंदिरात दर्शनासाठी दिवसभर रीघ लागली होती.

**बा, स्वामीराया सगळी कडे आनंदी आनंद राहू दे**

श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहमध्ये सोमवारी प्रचंड गर्दी होती, यातील प्रत्येक जण आपल्या श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या समाधीच्या दर्शनासाठी येत होता. यंदा शेती बहरू दे, सगळीकडे आनंदी आनंद राहू दे असे साकडे वारकऱ्यांनी स्वामींना घातले. सोमवारी सकाळी एकनाथ महाराज सदगीर, दुपारी रामभाऊ महाराज राऊत, तर रात्री रामकृष्ण महाराज लहवितकर यांचे कीर्तन झाले.

**"स्वामीपथ" चे प्रकाशन**

श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा "स्वामीपथ" विशेषांक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आला. दरम्यान शांताराम मगर यांनी ड्रोनद्वारे छायाचित्रण करण्यात आले.

**देवभक्ती, देशभक्तीमध्ये मानवाचे कल्याण : एकनाथ महाराज सदगीर**

देवभक्तीसोबतच देशभक्ती मध्ये मानवाचे कल्याण असून संत व महापुरुषांच्या विचारांचे आचरण करावे असे मत एकनाथ महाराज सदगीर यांनी कीर्तनात व्यक्त केले.

**सप्ताहाची आज सांगता**

२७७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची आज दिनांक ९ रोजी सांगता होत आहे, आज सकाळी संस्थानचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे यांचे काल्याचे कीर्तन होऊन भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे. सप्ताह यशस्वितेसाठी संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांच्यासह विश्वस्त व सप्ताह समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहे.

# 'हर घर तिरंगा' घाणेगाव तांडा येथे तिरंगा ध्वजाची भव्य रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षांनिमित्त केंद्र सरकारने 'हर घर तिरंगा' उपक्रमाचे आयोजन केले आहे. या मोहिमे अंतर्गत मोठ्याप्रमाणावर कार्यक्रमांचे केंद्र सरकारने आयोजन केले आहे. यात आता नागरिक देखील हिरीरीने सहभागी होत आहे. औरंगाबादपासून जवळ असलेल्या घाणेगाव तांडा येथे महाविद्यालय या मोहिमेत विद्यार्थी सहभागी झाले आहे. घाणेगाव तांडा येथील माध्यमिक विद्यालय व प्राथमिक शाळेच्यावतीने सकाळी तब्बल तिरंगा ध्वजाची रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यासह ग्रामस्थांनी उत्फूर्त सहभाग घेतला.

घाणेगाव तांडा येथे वी.जा. माध्यमिक विद्यालय व प्राथमिक शाळा आहे. यावर्षी स्वातंत्र्यदिन भव्य पध्दतीने साजरा करण्यात येणार आहे. यासाठी 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' कार्यक्रमाअंतर्गत केंद्र सरकारने 'हर घर तिरंगा' या मोहिमेचे आयोजन केले आहे. महाविद्यालयाने देखील या मोहिमेत भव्यदिव्य पद्धतीने सहभागी होण्याचा निर्धार केला. या अनुसंगाने तिरंगा ध्वजाची प्रभात फेरी काढण्याचे निश्चित करण्यात आले.

सकाळी वी.जा. माध्यमिक आश्रम शाळा आवारातून फेरीस सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी झेंडा हातात उचलून धरत गावातून फेरी काढली. या अनोख्या फेरीत ग्रामस्थांनी देखील सहभाग घेतला. भारत माता की जय, हर घर तिरंगा अशा घोषणांचा जयघोष करत संपूर्ण गावातून ही फेरी काढण्यात आली. देशभक्तीची भावना विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी ही रॅली काढण्यात आल्याची माहिती घाणेगाव तांडा ग्रामपंचायत सरपंच रत्नाबाई सुरेश चव्हाण माहिती दिली.

या उपक्रमात मुख्याध्यापक आर.बी.चव्हाण, सरपंच रत्नाबाई चव्हाण, सुरेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भागवत चव्हाण, ऐन.चव्हाण, लवांडे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.






# आरएसएसच्या नागपूर मुख्य कार्यालयासाठी वंचित बहुजन आघाडीच्या मार्फत राष्ट्रीय ध्वज

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत देशातील राजकीय पक्ष असलेला भारतीय जनता पार्टी हा पक्ष ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांच्या इशाऱ्यावर काम करणारा पक्ष असून आर.एस.एस च्या अजेंड्याप्रमाणे भारतीय जनता पार्टी व सध्या भारतात असलेले केंद्र शासन हे आरएसएस या संघटनेच्या अजेंड्याप्रमाणे काम करताना दिसत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या देश विघातक कृत्य करणाऱ्या संघटनेचा भारतीय जनता पार्टीमार्फत चालू असलेला प्रयत्न म्हणजेच घरोघरी भारतीय राष्ट्रीय ध्वज (तिरंगा) हा वाटप करण्याचे काम हे भारतीय जनता पार्टी मार्फत या येणाऱ्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कटकारस्थान करून हा तिरंगा झेंडा वाटप करण्याचे काम करून तिरंगाचा अवमान करण्याचे काम भारतीय जनता पार्टी करीत आहे. परंतु जी भारतीय जनता पार्टी आरएसएस सारख्या भारत देशात अराजकता माजवुन व माणसा - माणसामध्ये भेद निर्माण करून धर्माच्या नावाने राजकारण करणाऱ्या संघटनेच्या अजेंड्याप्रमाणे काम करीत आहे, असे शंकर खरात यांनी सांगितले.

त्या भारतीय जनता पार्टीच्यावतीने आजतागायत कुठल्याही प्रकारे आरएसएस या संघटनेच्या कुठल्याही कार्यक्रमात आजपर्यत भारतीय राष्ट्रीय ध्वज (तिरंगा झेंडा) कधीच फडकवताना कोणालाच आढळून आले नाही. याचा आवाज देखील वंचित बहूजन आघाडीचे पक्षप्रमुख अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संसदेत आवाज उठवला होता व त्यावेळेचे केंद्र शासनातील भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य आणि विरोधी पक्षनेते यांच्यात जोरदार शाब्दीक चकमकी उडाल्या होत्या. धुळे जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने यांच्या मार्फत भारतीय राष्ट्रीय ध्वज (तिरंगा झेंडा) हा नागपूर येथे स्थित असलेल्या आरएसएस या संघटनेच्या कार्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून फडकविण्यात यावा व या आरएसएस संघटनेचे प्रमुख असलेले मोहन भागवत यांना आदेशीत करण्यात यावे की, भारतीय राष्ट्रीय ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान व अपमान करता काम नये आणि आम्ही आपणास या निवेदनाद्वारे अशी विनंती करतो की, ही संघटना जेव्हापासून अस्तित्वात आहे तेव्हापासून हिचे स्वतंत्र कार्य, स्वताःचे नियम हुकूमशाही पध्दतीने काम करीत असते.

तरी तिरंगा झेंडाचा भारतीय जनता पार्टीच्या देशात असलेल्या केंद्र शासनामार्फत हा तिरंगा झेंडा भारतीय जनता पार्टीच्या जननी असलेल्या आरएसएस या संघटनेच्या नागपूर स्थित असलेल्या मुख्य कार्यालयात भारतीय राष्ट्रीय ध्वज म्हणजे तिरंगा झेंडा हा आरएसएसच्या नागपूर कार्यालयात देण्यात यावा व नंतर संपूर्ण भारतभर तिरंगा झेंडा हा वाटप करण्याचे काम करावे परंतू वाटप करीत असताना भारतीय राष्ट्रध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान व अपमान होणार नाही याची काळजी करूनच भारतीय जनता पार्टीने आपल्या भारत देशाचा तिरंगा झेंडा वाटप करावा. परंतु भारतीय जनता पार्टी हे काम करू शकणार नाही कारण भारतीय तिरंगा झेंडाला भारतीय जनता पार्टीचा अंतर्गत विरोध असल्याकारणाने, वंचित बहुजन आघाडी धुळे जिल्ह्याचे जिल्हा संघटक शंकर आण्णा खरात यांच्या वतीने त्यांच्या मार्फत हा तिरंगा झेंडा भारतीय जनता पार्टीच्या जननी असलेल्या आरएसएसच्या मुख्य कार्यालय नागपूर येथे देण्यात यावा असे निवेदन देण्यात आले.

# कै. अशोकराव मगर कन्नड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बालिकाश्रमच्या मुलांना दिले स्नेहभोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** कै. अशोकराव मगर कन्नड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बालिकाश्रमच्या मुलांना स्नेहभोजन देण्यात आले. संभाजीनगर येथील भगवानबाबा बालिकाश्रम सातारा परिसर येथे स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी अन्न बचाव कृती समितीचे अध्यक्ष अनंत मोताळे, ममता हॉस्पिटलचे डॉ. पिंपळे, मा. समाज कल्याण अधिकारी सौदागर, राजेश पवार, सुभाष मगर, अ‍ॅड. किरण मगर, अमरदीप मगर इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या वतीने कविता वाघ यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. यावेळी अ‍ॅड. किरण मगर बोलताना म्हणाले, उपस्थित बालकांसाठी या पुढेही शक्य ते प्रयत्नशिल राहील, असे आश्वासन देवून सामाजिक बांधिलकी म्हणून या बालकांसाठी उपक्रम राबविण्याचे इतरांना आवाहन केले. आभार शेखर मगर यांनी मानले.



# वसंतराव नाईक प्रतिष्ठान करणार शेतकरी आणि कृषी शास्त्रज्ञांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा कृषी क्रांतीचे व रोहयोचे जनक स्व.वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त वसंतराव नाईक प्रतिष्ठान 'वसंतराव नाईक कृषी गौरव' पुरस्कार दि. १८ ऑगस्ट रोजी प्रदान समारंभ येथील सुधाकरराव नाईक सभागृहात होणार आहे. बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून हवामान अभ्यासक पंजाबराव डख उपस्थित राहतील, असे वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक आसेगावकर यांनी सांगितले.

सभेला सचिव प्राचार्य डॉ. उत्तम रुद्रवार, प्रा.गोविंद फुके, सिराज हिराणी, मोहिनी नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले. गेल्या ४२ वर्षांपासून स्मृतीदिनानिमित्त शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येतो. आत्तापर्यंत जवळपास ४०० च्यावर शेतकरी व कृषी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन मिळाले.

गेल्या ४० वर्षांत महाराष्ट्रातील १०० मान्यवरांना कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले. १८ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी ३ वाजता डॉ. जितेंद्र कदम यांचे हळद पिकावर मार्गदर्शन होणार आहे. सत्कारमुर्ती कृषी शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन व सत्कारमुर्ती शेतकऱ्यांचे अनुभव कथन होणार असल्याचे आसेगावकर यांनी सांगितले. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन वसंतराव नाईक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृषीभूषण दीपक आसेगावकर यांनी केले आहे.

## जिल्हास्तरीय भालाफेक स्पर्धा

# शाहरुख, चंचल, आदित्य, वैशाली विजेते

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** टोक्यो ओलंपिकमध्ये ७ ऑगस्टला भारताच्या नीरज चोप्रा ने भालाफेक या ॲथलेटिक्सच्य क्रीडा प्रकारात सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला. नीरज चोप्राची ही कामगिरी सर्व उदयनूक खेळाडूंना प्रेरणा देत राहावं याकरिता भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या वतीने देशभर ७ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय भालाफेक दिन म्हणून साजरा करण्यात आला. याचाच एक भाग म्हणून औरंगाबाद जिल्ह्या ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या मैदानावर जिल्हास्तरीय भालाफेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून राज्य ॲथलेटिक्स संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे, उपप्राचार्य डॉ.माधव गायकवाड, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव डॉ.फुलचंद सलामपुरे हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून दीडशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

**स्पर्धेचा निकाल**

पुरुष खुला गट : प्रथमः शाहरुख शेख, द्वितीयः रवींद्र थोरे, तृतीय : तुषार शिंदे. महिला खुला गट : प्रथम : चंचल देवकर, द्वितीय : दिव्या इंगळे, तृतीय : दिशा जोशी. वीस वर्षा आतील मुले प्रथमः- आदित्य नरवडे, द्वितीय : अभिषेक गदादे, तृतीय : संदेश फोलाने. वीस वर्षा आतील मुली, प्रथम : वैशाली लिंगायत, द्वितीय : योगिता कदम, तृतीय : खुशी फत्तेलष्कर.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ॲथलेटिक्सचे तांत्रिक समितीचे प्रमुख डॉ. दयानंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा प्रबोधिनीच्य प्राचार्य पुनम नवगिरे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुरेंद्र मोदी, डॉ. सचिन देशमुख, डॉ.राम जाधव, डॉ.सुहास यादव, प्रा. मधुकर वाकळे, भरत रेडी, प्रा. राहुल अहिरे आणि तुषार खेडकर यांनी परिश्रम घेतले. तर संपूर्ण स्पर्धेचे समालोचन प्रा. अमृत बिराडे यांनी केले.



भालाफेक स्पर्धेतील विजयी खेळाडूंसोबत राज्य ॲथलेटिक्स संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर घुगे, उपप्राचार्य डॉ.माधव गायकवाड, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव डॉ. फुलचंद सलामपुरे, तांत्रिक समितीचे प्रमुख डॉ. दयानंद कांबळे, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्य पुनम नवगिरे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुरेंद्र मोदी, समालोचक प्रा.अमृत बिराडे.

# डॉ. संजय गायकवाड आंतरराष्ट्रीय आशिया पॅसिफिक 2022 पुरस्काराने सन्मानित




आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** नांदेडचे भूमिपुत्र आणि राज्य कामगार विमा सोसायटीचे उपसंचालक डॉ. संजय माधवराव गायकवाड यांनी कोरोनाकाळात एक व्हॉटसअप स्टेटस ठेवला होता की "जर कोणाला ऑक्सिजन, अत्यावश्यक सेवा, बेड्स, नोडल ऑफिसरचे नंबर पाहिजे असतील तर मला कॉल किंवा मेसेज करा" त्याचा परिणाम असा झाला की महाराष्ट्रातीलच नव्हे तर, सर्व भारतातून दिवसा फोन, मेसेज यायचे आणि रात्री सर्व जगातून फोन, मेसेज त्यांना यायचे. या कार्याची दखल घेत डॉ. संजय गायकवाड यांना आशिया आंतरराष्ट्रीय आशिया पॅसिफिक 2022 पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

कोरोनाच्या काळात सर्व जग स्तब्ध होते. त्यावेळेस डॉ. संजय गायकवाड आणि त्यांचा कुत्रा शेरू (सध्या तो स्वर्गवासी आहे) दोघेच घरी होते. तर डॉ. संजय गायकवाड यांच्या पत्नी सौ. कल्पना गायकवाड या स्वगावी होत्या. त्यांची खोली चोवीस तास चॅनेलसारखी झाली होती. जेवण बनवायला गेलं तर सारखे फोन, मेसेज चालू होते. त्यामुळे जेवण बनवणे बंदच केले. फक्त बिस्कीट आणि पाणी घेवून सर्व जगातील लोकांना मार्गदर्शन ते करीत होते. सर्व एनजीओचे फोन अगोदर डॉ. संजय गायकवाड यांना यायचे. त्यांच्याकडून माहिती घेवून ते इतरांना सांगायचे. डॉ. संजय गायकवाड यांनी A, B,C,D प्लॅन्स बनवले होते. कारण सर्वांना अटेंड करणं गरजेचं होते. जर कोणी सिव्हिल सर्जन, कलेक्टर, नोडल ऑफिसर मदत करत नसेल तर त्यांच्याकडून मदत कशी घ्यायची, हे प्लॅन्स मधून गायकवाड सामान्य लोकांना सांगत होतो. त्यांच्या पहिल्या दोन प्लॅन्समुळेच स्वतः शासकीय अधिकारी सामान्य लोकांना मदत करू लागले. आपल्या देशातील नागरिक बाहेर देशात होते. विमान सेवा बंद होती. त्यांचे नातेवाईक तेथे अडकले होते. सगळीकडे कोरोणाच्या नावावर लुटालूट चालू होती. त्यांच्याकडे पैसा होता पण खरी माहिती वा मदत मिळत नव्हती. म्हणून डॉ. संजय गायकवाड यांच्या व्हॉट्सॲप मेसेजमुळे त्यांना संपर्क करायचे. त्यांच्याकडील माहितीमुळे बऱ्याच जणांचे प्राण वाचले.

लोकांच्या डेड बोडीज हॉस्पिटलमधून मिळवून दिल्या. डबडबत्या अश्रूंनी त्यांना देव म्हणत होते तर कोणी देवता. त्यांचे कौतुक ऐकण्यासाठी सुद्धा त्यांच्याकडे वेळ नव्हता. रात्री ते फक्त एक ते दोन तास झोपायचे. या अस्मरणीय आणि अद्वितीय सामाजिक कार्याची दखल घेत बॅकॉक थायलंड येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय आशिया पॅसिफिक 2022 पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल डॉ.संजय गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पोटासाठी नाचते मी परवा कुणाची...



## कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी करावी लागतेय तारेवरची कसरत

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश वाघमारे**

**चिंचोटी :** गरीबीत जीवन जगत असताना प्रत्येकाला तारेवरची कसरत करावी लागते. पण शेतकरी आणि समाजशील माणसांना थोडी बहुत आरामदायी कसरत करावी लागते. पण भूमिहीन भटक्या जातीच्या माणसांना आपल्या आणि कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी जीवघेणी कलाकारी करावी लागते.

अशीच जीवघेणी कलाकारी सादर करत फिरती ती म्हणजे घोडेगाव ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील पल्लवी वाघ नावाची महिला आपले पती आणि छोट्या दोन मुली यांच्या सोबत गावो-गाव आपल्या अंगातील कला सादर करते आणि लोक कला पाहून चार-दोन रूपयाची मदत करतात त्यावर कुटूंबाचा चरितार्थ चालते. भूमिहीन आणि भटक्या जातीतील असल्यामुळे मोलमजुरीची कामे मिळत नाहीत. आणि कुटूंब मोठं असल्यामुळे मजुरीवर घरखर्च भागत नाही. त्यामुळे या मेहनतीवर घर भागत आणि प्रपंच चालतो. पण एवढं मात्र नक्की की यामध्ये जीवाला धोका आहे. पण काय करता पर्याय पण नाही. उंचावर बांधलेल्या दोरीवरून चालणे, जाळातून उड्या मारणे, गळ्याला लावून लोखंडी सळई वाकवणे वगैरे खेळामध्ये जीवाला धोका आहे, पण कुटूंब चालवण्यासाठी दुसरा पर्याय नसल्याचे पल्लवी वाघ यांनी दै. आधुनिक केसरी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# बीड जिल्हा इतिहास दिनानिमित्त राक्षसभुवन येथे व्याख्यानाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र प्रांत बीड शाखेद्वारा मराठा सत्तेने निजामसत्तेचा पराभव करुन विजयप्राप्त केला हा दिन बीड जिल्हा इतिहास दिन साजरा केला जातो व क्रांतीदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यानिमित्त मा. नितीन डोळे, मा प्रा डॉ शरदराव हेबाळकर इतिहास अभ्यासक मा माणिकजी बावणे हे प्रमुख अतिथी उपस्थित रहाणार आहेत. तसेच प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी, प्रा डॉ मुकुंद देवर्षी, प्रा. धनंजय जवळेकर, प्रा. रवि सातभाई, प्रमोदजी कुलकर्णी, प्रान्त कार्यकारीणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी हे युध्द झाले त्या ठिकाणी राक्षस भुवन, जि बीड येथे आज मंगळवार, दि 9/8/2022 रोजी सकाळी 11.00 वाजता यावर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये गावातील लोकसहभाग अधिक आहे. यासाठी श्री. नाटकर सर, संजय डोळे, पाठक सर यांचे साह्य मिळत आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील इतिहासप्रेमीनी उपस्थित रहावे, असे आवाहन बीड जिल्हा इतिहास संकलन संस्था शाखा पदाधिकारी राजेश विर्धे, मुकुंद कुलकर्णी, नागनाथ सांळुके, प्रा. शाता जाधवर व संयोजक प्रा .शशिकांत पसारकर यांनी केले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत



(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

# लैंगिक समस्या निदान व उपचार...

आधुनिक केसरी

**वंध्यत्व आणि नपुंसकता :** पुरुषांमध्ये ज्या लैंगिक समस्या प्रामुख्याने आढळतात त्यामध्ये शीघ्रपतन, नपुंसकता, वंध्यत्व ही एक मोठी समस्या आहे. या समस्यांमागे आपल्याला अनेक कारने आढळून येतात जसं की ताणतणाव, व्यसनं, अनियमित आहार, फास्ट फूड. शारीरिक संबंधानंतरही जेव्हा गर्भधारणा राहात नाही त्याला वंध्यत्व असं म्हटलं जातं. वंध्यत्व हे फकत स्त्रियांनामध्येच असते असे नाही तर ते पुरूषांना सुद्धा असते. पुरेशा प्रमाणात शुक्राणू तयार न होणे, त्यांचा आकार आणि वेग योग्य नसणे या कारणांमुळे पुरुषाला वंध्यत्व येते.

नपुंसकतेबद्दल सांगायचं झालं तर समाधानकारक शरीरसंबंध प्रस्थापित करण्यासाठी पुरुषांच्या शिश्नामध्ये कठोरता न येणे किंवा वीर्यस्खलनापूर्वीच शिथिलता येणे म्हणजे नपुंसकता नंपुसकता. आणि वंध्यत्व या दोन भिन्न बाबी आहेत. नपुंसकतेची तीन महत्त्वाची करणे सांगता येतात. मानसिक (सायकोजेनिक), रक्तवाहिन्यांचे आजार (व्हासक्युलोजेनिक), मज्जासंस्थेचा आजार (न्यूरोजेनिक) वय वर्षे २० ते वर्षे ९० या काळात हा आजार कोणालाही आणि कधीही होऊ शकतो. नपुंसकतेवर इलाज निश्चितपणानं उपलब्ध आहेत. नियमित व्यायाम, व्यसनांपासून मुक्ती आणि तणावपूर्ण जीवनशैलीतून बाहेर पडणे. यामुळे नपुंसकता ५० टक्क्याहून अधिक प्रमाणात बरी होईल आणि मग उरलेलं काम डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषध, गोळ्या, मलम यांचा वापर तसेच इंजेक्शन थेरपी, पेनाईल इम्प्लांट व स्टेम सेल थेरपीसारख्या थेरपीमुळे करता येईल. हे सर्व प्रकारचे उपचार आमच्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. सर्व प्रकारच्या गोळ्या, इंजेक्शन, मलम या सर्व गोष्टींचा वापर करुनहीं जर नपुंसकता दूर झाली नाही तर त्यावर पेनाईल इम्प्लाट नावाची उपचार पद्धती उपलब्ध आहे. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com